
वर्ष : 1 अंक : 1
ऑगस्ट 2026
(ऑनलाईन मासिक)

# अक्षर मानव वार्तापत्र

माणसांची संघटना

## झाड संमेलन विशेषांक

दर महिन्याला आपल्या भेटीला



अक्षर मानव झाड संमेलन | वाचकांच्या प्रतिक्रिया | कविता साहित्य | आगामी उपक्रम

अक्षर मानव

वर्ष : 1 अंक : 1

ऑगस्ट 2026


# अक्षर मानव वार्तापत्र

प्रेरणास्थान

**राजन खान**

संपादक

**अरुण मापारी**



अक्षर मानव, 959, पवनपुत्र, शिवाजी रस्ता, राष्ट्रभुषण चौक, शुक्रवार पेठ, पुणे 411002

ई-मेल : aksharmanav@gmail.com

वेब साईट : www.aksharmanav.org

## अनुक्रमणिका

**संपादकीय | 5**
अरुण मापारी

**अक्षर मानव झाड संमेलन – एक त्रिमाऊली संगम | 6**
सुजित चव्हाण

**एका वर्षाचा प्रवास... सहभागी ते बालविभाग संचालक | 10**
सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा

**मनगावात रुजलेली उद्याची सावली |12**
अजिंक्य किन्हीकर

**माझाही खारीचा वाटा | 17**
कल्पना उबाळे


**साहित्य, संस्कृती, झाड आणि माणूस - एक अनोखा संगम | 18**
स्वाती पवार राणे अंबरनाथ

**झाडांशी नाते जोडणारे अक्षर मानव झाड संमेलन| 20**
रमा गिरी

**समाज | 23**
कल्पना उबाळे

**अक्षर मानव भाषा शिकवणीवर्ग | 24**
सुजित कल्पना मारुती

**संगीत रजनी | 25**
विद्या पवार



**संपादकीय मंडळ**

अजिंक्य किन्हीकर

अरुण मापारी

सुजित चव्हाण

सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा

कल्पना उबाळे

विद्या पवार

**मुखपृष्ठ, अंक मांडणी, सजावट**

अरुण मापारी

**प्रतिक्रिया | 26**

मीरा शुक्ल

**कविता**

**सभागृह अजून भरलेले आहे..| 27**

सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा

**डिप्रेशन | 27**

कल्पना दिलीप मापुसकर

**अवसान |28**

कल्पना उबाळे

**श्रावणधारा | 28**

विद्या पवार

**मुलाखत**

**निसर्ग सेवा हाच माझा वसा - रमेश खरमाळे | 30**

सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा

**मानसोपचारतज्ज्ञ व अभ्यासकांची परिषद | 33**

डॉ. यमुना नाखले

**बालपण देगा देवा... | 34**

मोहन कळमकर

**दृष्टिक्षेप | 35**

**आगामी उपक्रम |39**

**सामील व्हा | 42**

**पुस्तक परीक्षण | 43**

अक्षर मानव

माणसांची संघटना

# तुमची आमची भेट
# आता दर महिन्याला!

**नमस्कार,**

**अक्षर मानव**च्या उपक्रमांना गेल्या अनेक वर्षांपासून तुमचा प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. अनेकदा काहीजण अक्षर मानवच्या उपक्रमांबद्दल, ध्येयधोरणांबद्दल विचारत असतात. आमचे सदस्य आपल्यापर्यंत ती माहिती पुरवत असतात. पण कधी कधी महत्त्वाचे उपक्रम किंवा महत्त्वाची माहिती आपल्यापर्यंत पोहोचत नाही.

त्यामुळे आमच्या टीमने **दर महिन्याला अक्षर मानवचा मासिक अंक काढायचे** ठरवले. या अंकाद्वारे अक्षर मानवचे नियमित होणारे उपक्रम, माहितीपूर्ण पोस्ट तुमच्यापर्यंत सहजपणे पोहोचवणे आता सोपे होणार आहे. शिवाय तुम्हालाही आमच्यासोबत सहजपणे संवाद करणे सोपे होणार आहे.

**हा मासिक अंक तुमच्यासाठी विनामूल्य असेल.** हा ई अंक पीडीएफ स्वरूपात तुम्हाला व्हाट्सअप किंवा ईमेल द्वारे मिळेल.

अक्षर मानवच्या उपक्रमांना मदत करण्यासाठी, एखाद्या अंकाचा खर्च उचलून तो स्पॉन्सर करण्यासाठी, किंवा इतर प्रकारे **सहभागी होण्यासाठी तुमची इच्छा असेल** तर संपर्क करा.

**अरुण मापारी**

अध्यक्ष, अक्षर मानव महाराष्ट्र

8888022099

तुम्हाला दर महिन्याला अंक विनामूल्य हवा असल्यास या लिंकवर भेट द्या

**लिंक :** https://bit.ly/4hkH7q2

**अधिक माहितीसाठी:**

teamaksharmanav@gmail.com /8888022099

# अक्षर मानव समजून घेऊ !

जगभर जेवढे भेदांचे प्रकार आहेत, ते संपवणं हे **अक्षर मानव** संघटनेचं ध्येय आहे. माणूस केवळ माणूस म्हणून जगू शकतो यावर संघटनेचा विश्वास आहे. त्यासाठीच संघटना राबते. माणसं सतत एकत्र येतील आणि त्यांच्यात माणूस म्हणून एकमेकांबद्दल विश्वास निर्माण होईल असे अनेक कार्यक्रम संघटना घेते. अनेक प्रकारची, विषयांची संमेलनं अक्षर मानवकडून सतत आयोजित केली जातात. माणसाच्या विकासाचे आणि उन्नतीचे अनेक कार्यक्रम घेतल्या जातात. शेती, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण हे माणसाच्या गरजेचे मूलभूत विषय आहेत, त्यासाठी अनेक उपक्रम घेतले जातात. कला, साहित्य, मानवी संस्कृती यांच्या वृध्दीचे अनेक कार्यक्रम अक्षर मानव संघटना करते.

अक्षर मानव हे बौध्दिक काम करणारं संघटन आहे. माणूस मेंदूनं सुधारला, बुध्दिमान झाला, विचारशील झाला तरच जगातले असंख्य मानवी प्रश्न सुटतील असं अक्षर मानव संघटनेला वाटतं. अक्षर मानव माणसाच्या बुध्दी विकासासाठी धडपडते. संघटना चालवायची तर त्यासाठी लागतं मनुष्यबळ आणि पैसा. आणि अशा मानवी ध्येयाचं काम करायचं तर, ते एका रात्रीत शक्य नाही, तर पुढचा अनंत काळ ते काम चाललं पाहिजे. समाजात त्यासाठी खूप राबलं पाहिजे, सतत राबत राहिलं पाहिजे पिढ्यानपिढ्या आणि त्यासाठीही सतत माणसांचे उपक्रम घेत राहिलं पाहिजे. माणूस निर्मळ, नेक, प्रामाणिक, अभ्रष्ट झाला पाहिजे अन जगला पाहिजे असंही संघटनेला वाटतं. मानवी नीतिमूल्यांवर माणूस जगतो, त्यासाठी त्याला कोणत्याच भेदांची गरज नाही असं वाटतं. या संघटनेच्या त्या राबण्याला बळ हवं. राज्यभर, देशभर राबायचं आहे. भेदरहीत आनंदी आणि सुखी समाज जगभर उभा करायचा आहे.

स्वतःचा कारभार चालवण्यासाठी जग नियमितपणे काही नवे व्यवसाय, नवे शोध, नवीन उपक्रम, नव्या कल्पना सुरू करतं. जगाला वाटतं, आता या नव्या गोष्टींमुळं जगाचा विकास आणखी आणखी होईल. तो विकास व्हायला सुरुवातही होते. जग त्या नव्या गोष्टींचा लाभ घेऊ लागतं, आनंद घेऊ लागतं. आणि अचानक व्हायला असं लागतं, त्या नव्या गोष्टीचा गैर फायदा उचलून, तिचा स्वतःला अधिकाधिक लाभ करून घेण्यासाठी काही स्वार्थी लोक मुसंडी मारून त्या नव्या गोष्टीत शिरकाव करतात आणि त्या नव्या गोष्टीत भेसळ करून, ती जी नवी गोष्ट तोवर शुद्ध, प्रामाणिक, पारदर्शी स्वरूपात चालू असते, तिचा भ्रष्ट चिवडा करून टाकतात. तिचं वाटोळं करतात. ती गोष्ट स्वतःच्या लाभासाठी बेसुमार ओरबाडून घेतात. त्या गोष्टीत घाण करतात. त्या गोष्टीतल्या नैतिक गोष्टी अनैतिक करतात. एवढ्या अनैतिक करतात की, अनैतिकताच नंतर नंतर नैतिक ठरू लागते.

जगातलं कोणतंही क्षेत्र घ्या, ते क्षेत्र जगाच्या भल्यासाठी सुरू झालेलं असतं, ते सुरुवातीला फार

आदर्श, प्रामाणिक, निर्मळ, सुंदर असतं, पण हळूहळू त्या क्षेत्राचा लाभ घ्यायला काही भ्रष्ट आणि लुच्चे लोक त्यात शिरतात आणि त्या क्षेत्राला बाटवून त्याचा गलिच्छ राडा करून टाकतात. त्यात अप्रामाणिकपणा, गुप्तता, दुय्यमपणा, फालतूपणा, फसवणूक, भ्रष्टाचार, बेइमानी घुसवतात. आजवर जगानं शोधलेल्या कोणत्याही क्षेत्राचं हे असंच होत आलेलं आहे.

जग जगाचा व्यवहार सुरळीत, सुखी चालण्यासाठी नव्या क्षेत्रांची, गोष्टींची, कल्पनांची निर्मिती करत असतं आणि धंदेवाईक लोक त्यात घुसून त्याची वाताहत करत राहतात. मानवी जगाचं मुख्य दुःख हे आहे.

जगातली कोणतीही गोष्ट घ्या, शेती, आरोग्य, शिक्षण, विज्ञान, रोजगार, चित्रपट, नाटक, चित्रकला, कोणत्याही कला, कारागिरी, अन्न, नातेसंबंध, कुटुंबव्यवस्था, लग्न, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, असं कोणतंही क्षेत्र घ्या, कोणताही शोध घ्या, कोणतीही व्यवस्था घ्या, कोणताही उपक्रम घ्या, सगळ्यात हे दुय्यम दर्जाचे भ्रष्ट लोक शिरतात आणि सुरळीत व्यवस्था वाकडी करून टाकतात.

तर जगातली ही प्रत्येक क्षेत्रात घुसणारी भ्रष्ट व्यवस्था रोखणं, जन्मालाच येऊ न देणं, आलीच तर उखडून तिचा समूळ नायनाट करणं आणि जग सरळमार्गी, शांत, सुखी, प्रामाणिक, पारदर्शी, स्वच्छ, निर्मळ, निर्भेळ करणं आणि ते तसंच कायम चालत राहील याचा बंदोबस्त चोख ठेवणं, म्हणजे आवश्यक आणि योग्य काम. ते अक्षर मानव करू पाहत आहे.

**अरुण मापारी**

8888022099

अध्यक्ष, अक्षर मानव महाराष्ट्र





# अक्षर मानव झाड संमेलन - एक त्रिमाऊली संगम

**सुजित कल्पना मारुती चव्हाण.**
संघटक, अक्षर मानव महाराष्ट्र

यावर्षी अक्षर मानव कडून प्रथमच झाड संमेलन - एक संवाद झाडांशी अशा आशयाचं एक अनोखं संमेलन २५ व २६ जुलै २०२६ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील, देहरे या गावी घेण्यात आलं. हे संमेलन केवळ अक्षर मानव कुटुंबातीलच नाही तर कदाचित हे जगातील पहिलं संमेलन असावं ज्याला **झाड संमेलन** हे नाव देण्यात आलं. अक्षर मानव विविध 90 क्षेत्रांमध्ये काम करीत आहे. त्यापैकी एक झाडं लावणारी फौज विभाग आहे.

आज आपण सर्वजण वृक्षतोडीबद्दल, पर्यावरणाच्या विविध प्रश्नांबद्दल माणसांमध्ये, समाज माध्यमांमध्ये होणाऱ्या चर्चा ऐकत असतो. त्यातून समाजमन एका अर्थाने व्याकुळ, हतबल, हताश अशा परिस्थितीत असल्याची जाणीव होते. अशा परिस्थितीत मी माणूस म्हणून काय करू शकतो? याचा सकारात्मक विचार अक्षर मानव कुटुंबात पेरला जातो. त्यातून झाडं लावण्याची जबाबदारी आपणच घेऊ असं ठरलं. ज्यांना मानवी समाजाचं, माणसांचं भलं व्हावं असं वाटतं त्यांनी तक्रारी करण्यात आणि व्यवस्थेला दोष देण्यात आपला मौलिक वेळ वाया घालवू नये. प्रश्नांवर केवळ हाताची घडी घालून बसण्यापेक्षा आणि आपलं बुड आपटत बसण्यापेक्षा काही काम करता येतं का याबाजूने विचार केला पाहिजे.

झाड संमेलनाच्या नियोजनासाठी अक्षर मानव कुटुंब, फेन्सकोट इंजिनिअर, वसुंधरा फाउंडेशन आणि माऊली सेवा प्रतिष्ठान देहरे, अहमदनगर या चार संस्था समोर आल्या.

नियोजनाची आणि मनुष्यबळाची मुख्य जबाबदारी या दोन कुटुंबानी सक्षमपणे उचलली आणि पेललीसुद्धा. वसुंधरा फाउंडेशन ने विविध प्रकारची शेकडो झाडं मोफत देऊ केली. तसेच त्यांचे वृक्षारोपणाचे जाणकार लोक पूर्ण नियोजनात सोबत राहिले. त्यांनी संमेलनाला उपस्थित राहून तिथं कोणतं झाड कुठं लावायचं याच उत्तम मार्गदर्शन केलं.

माऊली सेवा प्रतिष्ठान ही मनोरुग्ण महिलांचा मोफत सांभाळ करणारी संस्था आहे. या जागेला त्यांनी "मनगाव - मन आणि घर हरवलेल्या माणसांची संस्था" असं नाव दिलं आहे. ही संस्था अहमदनगर - शिर्डी रस्त्यावर जुन्या देहरे टोलनाक्याच्या परिसरात उभी आहे. या संस्थेचे संचालक डॉ. राजेंद्र धामणे आणि  डॉ. सुचेता धामणे हे दाम्पत्य जवळपास ५०० मनोरुग्ण महिलांची मोठ्या आपुलकीने सुश्रुषा करतं. यातील काही महिलांवर मनोरुग्ण झाल्यानंतर लैंगिक अत्याचार झालेले असल्याने त्यांच्या पोटी जन्माला आलेल्या जवळपास ४५ लहान मुलांना हे डॉक्टर दाम्पत्य आई बापाप्रमाणे मायेची ऊब देतं. ही मुलं देहरे गावातील शाळेमध्ये आई बाप म्हणून डॉक्टर दाम्पत्याच्या नावाने दाखल आहेत आणि शिक्षण घेत आहेत.



या सर्व संस्था, संघटना, कुटुंबांमध्ये एक मायेचा धागा, एक मदतीचा हात म्हणून वृक्षदूत, वृक्षप्रेमी, सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्या देवराई फाउंडेशन या संस्थेचा सुद्धा मोलाचा सहभाग होता. स्वतः सयाजी शिंदे हे आपल्या चित्रपटांच्या व्यस्त कामांमधून या झाड संमेलनाला उपस्थित राहिले होते. पडद्यावर दिसणारा खलनायक कलाकार, रागीट कलाकार आणि एकूणच एक उत्तम कलासाधक प्रत्यक्षात मात्र किती संवेदनशील, हळवा, मायाळू आणि उत्तम नागरिक आहे याचा अनुभव झाड संमेलनाला आलेल्या प्रत्येकानेच घेतला आहे.

सहज संवाद, बोलीभाषेतून दिलेला स्वतःचा परिचय आणि कसलाही आव न आणता सर्वांमध्ये मिळून मिसळून, रमून गेलेला माणूस. आज पर्यंत हजारो झाडं लावून शेकडो एकर जमिनींवर देवराई उभ्या केलेला हा अवलिया माणूस. त्यांच्या कामाबद्दल माहिती होतीच, पण प्रत्यक्ष संवादातून माणूस आणि त्याचे अनेक पैलू समजत गेले.

या लेखाच्या शीर्षकात "त्रिमाऊली" हा शब्द प्रयोग आला आहे. याची उकल करून देणं मला जास्त महत्वाचं वाटतं. सयाजी शिंदे हे ज्या आपुलकीने झाडांना नवजीवन देतात, नव संजीवनी देतात, त्यावरून मला ही व्यक्ती झाडांची माऊली वाटते. कारण राजरोसपणे होणारी जंगलांची कत्तल आणि लोकांची बघ्याची भूमिका या दोन गोष्टी सयाजी शिंदे यांना खूप वेदनादायी वाटतात. परंतु सयाजी शिंदे माणसांना अक्कल शिकवायला न जाता स्वतःच्या कामातून लोकांसमोर एक आदर्श ठेवण्याचा प्रयत्न करतात. झाड जगली पाहिजेत, जपली पाहिजे म्हणून प्रस्थापित व्यवस्थांशी लढा देतात, टक्कर घेतात. हा गुणधर्म एका माऊली मध्येच असू शकतो असा माझा ठाम विश्वास आहे. त्यामुळं सयाजी शिंदे हे मला झाडांची माऊली वाटतात.

दुसरं म्हणजे, माऊली सेवा प्रतिष्ठान चे संचालक डॉक्टर दाम्पत्य हे शेकडो मनोरुग्ण महिलांना सांभाळतात, त्यांच्या मुलांना स्वतःचं नाव देऊन त्यांची आयुष्यं उभी करतात. हे काम सुद्धा केवळ आणि केवळ एक माऊलीच करू शकते.

तिसरं म्हणजे, अक्षर मानव कुटुंब हे जगभरच्या सर्वच माणसांना कसलेही भेद न करता एकाच छताखाली आणून जगण्याच्या प्रत्येक क्षेत्रात समृद्ध करण्याचं स्वप्न घेऊन अहोरात्र झटत राहतं. माणसाला माणूस जोडणं, त्याला जगण्याची मूलभूत तत्व सांगणं आणि सुख दुःखात सोबत करणारं जागतिक कुटुंब उभं करणं, नैतिक कुटुंब उभं करणं हे सुद्धा काम एक माऊलीच करू शकते.

सयाजी शिंदे, धामणे डॉक्टर दाम्पत्य आणि अक्षर मानव कुटुंब या तीन माऊलींचा झालेला संगम म्हणजे त्रिमाऊली. ही गोष्ट प्रत्यक्षात उतरली ती झाड संमेलनात. त्यामुळं झाड संमेलन हे खूपच प्रेरणादायी संमेलन झालं आहे अशी माझी भावना आहे.

मी वर उल्लेख केल्याप्रमाणे अक्षर मानव कुटुंब हे अशाच सुंदर जगण्याच्या ९० वेगवेगळ्या विभागांचं काम करते. मी सध्या अक्षर मानव कुटुंबात महाराष्ट्र राज्य संघटक म्हणून काम पाहतो. माझं काम आहे पृथ्वीवरील सर्व माणसांना अक्षर मानव कुटुंबाशी जोडून घेणं. त्यांना त्यांच्या आवडीच्या विभागाशी / क्षेत्राशी संबंधित उपक्रमांमध्ये मदत करणं, सोबत करणं. तर ज्यांना अक्षर मानव कुटुंबाशी जोडून घ्यायचं आहे त्यांनी मला 9527212233 या नंबरवर आपला थोडक्यात परिचय आणि आपलं आवडीचं क्षेत्र केवळ वॉट्सअप्प मेसेज करून कळवावं.

आपण सर्वजण सर्व भेद बाजूला करून, निव्वळ माणूस म्हणून एकोप्याने राहू शकतो यावर अक्षर मानव कुटुंबाचा ठाम विश्वास आहे.

सर्व भेद बाजूला सारूया, चला माणूस होऊया!





# एका वर्षाचा प्रवास... सहभागी ते बालविभाग संचालक

**सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा**
बालविभाग संचालक, अक्षर मानव महाराष्ट्र




मागील वर्षी २४ जुलै, २०२५च्या माणूस संमेलनाला मी प्रथमच सहभागी झाले. माझ्यासोबत माझा मुलगा भार्गवही होता. नवीन अनुभव म्हणून आम्ही दोघेही गेलो; पण परतताना आमच्यासोबत केवळ आठवणी नव्हत्या, तर विचारांची एक नवी शिदोरी होती. भार्गवलाही हा अनुभव मनापासून आवडला. त्या एका दिवसाने आमच्या दोघांच्या मनात अक्षर मानवबद्दल आत्मीयता निर्माण केली.

अक्षर मानवचा आणखी एक अनुभव मला खूप वेगळा आणि हृदयाला स्पर्श करणारा वाटला. संमेलन कोणत्याही शहरात असो, सहभागींच्या निवासाची व्यवस्था हॉटेलमध्ये नव्हे, तर अक्षर मानव कुटुंबातील सदस्यांच्या घरी केली जाते. पहिल्यांदा हे ऐकून आश्चर्य वाटले; पण तो अनुभव घेतल्यावर समजले की, ही केवळ निवासाची व्यवस्था नसते, तर माणसांना माणसांशी जोडणारी एक सुंदर परंपरा असते. अनोळखी माणसे एका रात्रीत आपली वाटू लागतात. नाती रक्तानेच जुळतात असे नाही, ती विचारांनी आणि जिव्हाळ्यानेही जुळतात, याची प्रचिती मला इथे आली.

त्या दिवसानंतर अक्षर मानव माझ्यासाठी केवळ एक सामाजिक संस्था राहिली नाही; ती माझ्या विचारांची, माझ्या जगण्याची आणि माझ्या माणूसपणाला घडवणारी एक शाळा बनली.

वर्षभरात संस्थेच्या अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. वृक्ष संवर्धन, साहित्य, भाषा, बालउपक्रम, संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधन... प्रत्येक उपक्रमाने काहीतरी शिकवले.




प्रत्येक भेट, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक अनुभवाने माझ्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवला.

या प्रवासात माझ्या आयुष्यात एक सुंदर मैत्रीणही आली. कल्पना उबाळे ही मैत्रीण मला अक्षर मानवमुळेच मिळाली. कवितेचा माझा पुढचा प्रवास तिच्या सोबतीने अधिक समृद्ध झाला. विचारांची देवाणघेवाण, लेखनाविषयीच्या चर्चा आणि एकमेकींना दिलेली प्रेरणा यामुळे ही मैत्री माझ्यासाठी खूप मोलाची ठरली. काही नाती नियती जुळवते, पण त्यांना अर्थ देण्याचे काम असे विचारमंच करतात.

या संपूर्ण प्रवासात संस्थापक मा. राजन खान गुरुजी यांच्याबद्दलचा आदर दिवसेंदिवस अधिक वाढत गेला. त्यांनी मांडलेला माणुसकीचा विचार, प्रत्येक व्यक्तीशी साधेपणाने जोडून घेण्याची त्यांची शैली आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याची त्यांची तळमळ मनाला स्पर्शून जाते. त्यांच्याबद्दल मनात केवळ आदर नाही, तर एक जिव्हाळाही आहे. त्यांचे विचार ऐकताना अनेकदा स्वतःकडे नव्याने पाहावेसे वाटते.

आज अक्षर मानव बालविभागाची संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारताना मन कृतज्ञतेने भरून येते. एका वर्षापूर्वी मी आणि भार्गव हातात हात घालून माणूस संमेलनात सहभागी झालो होतो. आज अक्षर मानवने माझ्या हातात अनेक मुलांच्या मनात माणुसकीची बीजे पेरण्याची जबाबदारी दिली आहे. हा सन्मान जितका मोठा आहे, तितकीच त्याची जाणीवही मोठी आहे.

बालविभाग म्हणजे फक्त कार्यक्रम नव्हेत; तर मुलांमध्ये संवेदनशीलता, पर्यावरणप्रेम, वाचनाची आवड, सर्जनशीलता आणि माणूस म्हणून जगण्याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या जबाबदारीला न्याय देण्यासाठी माझे मनापासून प्रयत्न सुरू राहतील.

आज मागे वळून पाहताना जाणवते—एका वर्षात बदलले ते फक्त माझे पद नाही; बदलली ती माझी दृष्टी, माझा विचार आणि जगण्याची पद्धत.

मागच्या वर्षी मी भार्गवचा हात धरून माणूस संमेलनात आले होते... आज अक्षर मानवने माझा हात धरून अनेक बालमनांपर्यंत माणुसकी पोहोचवण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. या विश्वासाचे ऋण शब्दांनी नव्हे, तर कृतीतून फेडण्याचा माझा प्रयत्न असेल.

मनःपूर्वक आभार, अक्षर मानव परिवार!





प्रत्येक बैठक किंवा उपक्रम निसर्गरम्य वातावरणात असल्याने अक्षर मानव कुटुंबीय जसा काही सहलीचा आनंद घेतात.

# मनगावात रुजलेली उद्याची सावली

**अजिंक्य किन्हीकर**
राष्ट्रीय अध्यक्ष, अक्षर मानव, भारत

२५ आणि २६ जुलै २०२६ रोजी अक्षर मानवचं पहिलं झाड संमेलन मनगाव, माऊली सेवा प्रतिष्ठान, देहरे येथे भरलं. दोन दिवस तिथे वृक्षप्रेमींची प्रसन्न मांदियाळी जमली होती. कुणी झाडांविषयी बोलत होतं, कुणी कविता म्हणत होतं, कुणी आपला अनुभव सांगत होतं. काही माणसं पहिल्यांदाच भेटत होती. काहींच्या हातात रोपं होती. काहींच्या मनात पुढच्या कामाची चाहूल लागली होती.

झाडांचा विषय आला की मी अलिप्त राहू शकत नाही. उन्हाळ्यात दुरून डोंगर जळताना दिसले की माझ्याही जिवाची काहिली होते. काही तासांपूर्वी शांत उभा असलेला डोंगर धुराच्या आणि आगीच्या तावडीत गेलेला पाहणं असह्य वाटतं. आपण वृक्षारोपण करावं, झाडांसाठी काही ठोस काम करावं, असं आयुष्यात अनेकदा वाटलं.

शाळा, कॉलेज आणि खासगी कंपन्यांमध्ये काम करताना काही वृक्षारोपण कार्यक्रमांत सहभागीही झालो. कधी CSR उपक्रमाच्या निमित्ताने, कधी नवीन प्लांट सुरू करताना, तर कधी एखाद्या औपचारिक कार्यक्रमाचा भाग म्हणून रोपं लावण्याची संधीही मिळाली, माती हाताला लागली. छायाचित्रं झाली. कार्यक्रम संपला.

मनात मात्र एक प्रश्न नेहमी राहिला..

आपण लावलेलं रोप पुढे जगलं का?

आणि बऱ्याचदा त्याचं उत्तर "नाही" असं होतं.

म्हणून वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांकडे पाहताना माझ्या मनात नेहमी थोडी शंका असते. रोपं लावण्याच्या दिवशी उत्साह असतो. खरी परीक्षा त्यानंतर सुरू होते. पहिला उन्हाळा, पाण्याची कमतरता, जनावरांपासून संरक्षण, योग्य जागा आणि नियमित काळजी. हे सगळं निभावलं, तरच त्या रोपाची गोष्ट पुढे जाते. मनगावच्या परिसरातच ही झाडं लावली जाणार आहेत, हे कळल्यावर मात्र मनातली ही शंका केवळ नष्टच झाली नाही तर त्याची जागा विश्वास आणि आनंदानी घेतली!

मनगाव ही कार्यक्रमासाठी मिळालेली साधी जागा नाही. त्या भूमीवर आधीपासूनच माणसांना जपण्याचं मोठं काम सुरू आहे. डॉ. राजेंद्र धामणे आणि डॉ. सुचेता धामणे यांनी अनेक वर्षांपासून घर, आधार आणि सुरक्षितता हरवलेल्या आपल्या आईबहिणींना उपचार, निवारा आणि माणूस म्हणून जगण्याची जागा दिली आहे.


सयाजी शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण



मनगावमध्ये लावली जाणारी रोपं अशाच मायेच्या परिसरात वाढणार आहेत, माणसांना आयुष्यभराची साथ देणारे हात या झाडांनाही वाऱ्यावर सोडणार नाहीत, असा विश्वास वाटला.

त्यांच्या मुलांचं संगोपन, शिक्षण आणि आयुष्य उभं करण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे.

हे काम ऐकताना मोठं वाटतं आणि त्यांना प्रत्यक्ष वावरताना पाहिलं की ते आणखी मोठं भासतं. पण विशेष म्हणजे त्यांच्या वागण्यात मोठेपणाचा आव नाही. मनगावच्या रोजच्या जीवनात ते इतक्या सहजपणे मिसळलेले दिसतात की एवढ्या जिवांचं पालकत्व स्वीकारलेली ही दोन माणसं आपलं काम एखाद्या स्वाभाविक कर्तव्याप्रमाणे करत आहेत, असं वाटत राहतं. आपणही ह्या सहजतेचा भाग बनून जातो.

झाडं तर आपल्या सगळ्यांची मायबाप आहेत. हवा, सावली, अन्न, पाणी, माती आणि असंख्य जीवांचं घरपण ती जपतात. फक्त आपण जेव्हा ठरवून लावतो तेव्हा त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीला त्यांना आपल्या हातांची गरज असते. काही वर्षं आपण त्यांना वाढवतो. मग ती आपली, आपल्या मुलांची आणि पुढे येणाऱ्या कितीतरी पिढ्यांची काळजी घेत राहतात. मनगावमध्ये लावली जाणारी रोपं अशाच मायेच्या परिसरात वाढणार आहेत, माणसांना आयुष्यभराची साथ देणारे हात या झाडांनाही वाऱ्यावर सोडणार नाहीत, असा विश्वास वाटला. मनगाव आणि झाड संमेलनाचा हा योग विलक्षण समर्पक होता. काव्यात्म न्याय म्हणावा असा. ज्या जागी आयुष्याने मुळांपासून उपटलेल्या माणसांना पुन्हा आधार मिळतो, त्याच भूमीत पुढच्या पिढ्यांना सावली देणारी झाडं रुजत होती.

हे संमेलन घडवण्यासाठी संजय सपकाळ, अक्षर मानवची टीम, फेन्सकोट इंजिनिअर्स, वसुंधरा फाउंडेशन, माऊली सेवा प्रतिष्ठानमधील सहकारी, देवराईच्या कार्याशी जोडलेली मंडळी आणि सर्व स्वयंसेवकांनी अपार मेहनत घेतली. कार्यक्रमाला आलेल्या माणसाला तयार व्यवस्था दिसते. तिच्यामागचे फोन, बैठका, बदललेली नियोजनं, जमवलेली साधनं, बाजूला ठेवलेली झोप आणि जागच्या जागी सोडवलेल्या अडचणी सहसा दिसत नाहीत.

संजय सपकाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या जबाबदाऱ्या मनापासून सांभाळल्या. स्वयंसेवकांनी भोजन, निवास, स्वागत आणि प्रत्यक्ष वृक्षारोपणाच्या कामात स्वतःला झोकून दिलं. माऊली सेवा प्रतिष्ठानमधील मंडळींनी प्रेमाने आणि विलक्षण लवचीकपणे सहकार्य केलं. त्यामुळे त्या दोन दिवसांच्या मुक्कामाला औपचारिक कार्यक्रमापेक्षा घरच्या माणसांकडे आल्याची ऊब लाभली.

अक्षर मानवचे संस्थापक राजन खान गुरुजी प्रकृतीच्या कारणामुळे या संमेलनाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रम घडत आले आहेत. यावेळी त्यांच्या अनुपस्थितीतही अक्षर मानवच्या सहकाऱ्यांनी जबाबदारी उचलून संमेलन सुंदरपणे पार पाडलं. अमरावतीचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक थोरात यांनीही या गोष्टीचं आवर्जून कौतुक केलं. मला ते केवळ कार्यक्रमाचं कौतुक वाटलं नाही, तर एका पिढीने पुढच्या पिढीवर ठेवलेला विश्वास सार्थ झाल्याचं जाणवलं.

या संमेलनाच्या निमित्ताने काही नवी माणसंही भेटली. काही संवाद थोडे होते, पण माणसं लक्षात राहिली. कोणताही गाजावाजा न करता आपापल्या ठिकाणी काम करणारी माणसं एकत्र भेटली की मनाला बरं वाटतं. अनोळखी लोक एकत्र जेवतात, कामात हातभार लावतात, एकमेकांच्या गोष्टी ऐकतात आणि पुन्हा भेटण्याची इच्छा घेऊन परततात. संघटना अशाच क्षणांत जिवंत होत असावी.

अभिनेते आणि वृक्षप्रेमी सयाजी शिंदे यांची उपस्थिती या संमेलनाला वेगळं महत्त्व देणारी होती. देशी झाडं, देवराया आणि लावलेली झाडं जगवण्याचा त्यांचा आग्रह याविषयी आपण ऐकलेलं असतं. त्यांना बोलताना ऐकल्यावर त्या कामामागचा माणूस अधिक स्पष्टपणे जाणवला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सरळ, फ्रँक आणि रांगडा स्वभाव आहे. शब्दांना फुलोरा नाही. जे वाटतं ते रोखठोक सांगण्याची पद्धत आहे. पण त्यांच्या वागण्यात माया जाणवते. मुख्यतः त्यांच्या डोळ्यांतली करुणा बरंच काही सांगून जाते. झाडांचा विषय आला की ती आणखी बोलकी होते. त्यांचा मुद्दा साधा होता. “योग्य काय, अयोग्य काय हे सगळ्यांनाच कळतं. चांगलं आणि वाईट ओळखण्याची समज प्रत्येकाकडे असते." लोकांना त्याच त्या माहीत असलेल्या गोष्टी पुन्हा सांगण्यात त्यांना अर्थ वाटत नाही.
“आधी कृती करा. मग माझ्याशी बोला.” असा त्यांचा रोखठोक संवाद होता. तो विचार मी माझ्यासोबत घेऊन आलो.

आपण औपचारिकपणे बोलताना अनेकदा समोरच्या माणसाच्या समजुतीला कमी लेखतो. जणू योग्य दिशा त्याला कुणीतरी बाहेरून सांगितली, तरच ती कळणार आहे. प्रत्यक्षात प्रत्येकाच्या आत काहीतरी जाणणारं असतं. ते जागं झालं की माणूस स्वतःच कृतीकडे वळतो. इथून अक्षर मानवचा विचार अगदी सहज उलगडतो. प्रत्येक माणसाच्या आत एक चांगला माणूस असतो. स्वच्छ, अभ्रष्ट, दुसऱ्याच्या वेदनेने हलणारा आणि आपल्या भोवतालच्या जगाशी जोडला जाणारा, स्वतःच्या फायद्यापलीकडे पाहू शकणारा माणूस. समोरचं दुःख, जळणारं झाड, आटणारी नदी किंवा आधाराविना पडलेला जीव पाहून ज्याच्या आत काहीतरी हलतं असा. हा आतला खरा माणूस म्हणजे अक्षरमाणूस.

अक्षर मानवचा गाभा एका शब्दात सांगायचा तर तो करुणा. ती कुणाच्या आदेशाने निर्माण होत नाही. ती आतून जागी झाली की माणूस दुसऱ्या माणसाशी जोडला जातो. निसर्गाशी जोडला जातो. मग ती भाषणात अडकून राहत नाही. ती कुणाला आधार देण्यात, एखाद्या रोपासाठी योग्य जागा निवडण्यात आणि ते पुढची अनेक वर्षं जगेल याची जबाबदारी स्वीकारण्यात दिसते.

या संमेलनात अनेक प्रसंग घडले. पण माझ्या मनात कायमचा राहिलेला क्षण दुसऱ्या दिवशी सकाळी आला. रविवार, २६ जुलैला प्रत्यक्ष वृक्षारोपण सुरू झालं. सुरुवातीच्या अंदाजानुसार हे काम दोन ते तीन तासांत पूर्ण होईल, असं वाटत होतं. लोक उत्साहाने कामाला लागले. काही वेळाने कामात घाई होत असल्याचं आणि प्रत्येक रोप अपेक्षित काळजीने लावलं जात नसल्याचं संजय

सपकाळ यांच्या लक्षात आलं. त्यांनी सर्वांना थांबवलं. शांतपणे विनंती केली. सहभागींचे वेगवेगळे गट करण्यात आले. वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेल्या लागवडखड्ड्यात रोप नेमकं कसं ठेवायचं, माती कशी भरायची, मुळांना इजा होणार नाही याची काळजी कशी घ्यायची आणि पाणी कसं द्यायचं, या गोष्टी पुन्हा समजावून सांगण्यात आल्या.



कुठलं झाड कुठे लावायचं, हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न होता. प्रत्येक झाडाचा पसारा, मुळांची वाढ, उंची आणि सावली वेगळी असते. पिंपळासारख्या मोठ्या वृक्षांना पुरेसं अंतर लागतं. दोन मोठी झाडं अगदी जवळ लावली, तर पुढे त्यांची वाढ एकमेकांना अडचणीची ठरू शकते. बांधाजवळ डेरेदार झाड लावताना त्याच्या मुळांचा आणि पुढे वाढणाऱ्या आकाराचा विचार करावा लागतो.

आज रोप लावताना आपल्याला दोन फुटांची काडी दिसते. त्या जागी पन्नास किंवा शंभर वर्षांनी उभं राहणारं पूर्ण झाड मनात पाहता आलं पाहिजे. आपण करत असलेलं काम त्या दिवसापुरतं नव्हतं. ते काही महिन्यांचं किंवा काही वर्षांचंही नव्हतं. आपण दशकांशी, कदाचित शतक चालेल अशा गोष्टी करतोय ही जाणीव संजय सपकाळ यांनी सर्वांना करून दिली. त्यांच्या प्रत्येक कृतीतून ती दिसत होती. याच वेळी त्यांनी साधारण अठरा वर्षं किंवा त्याहून कमी वयाच्या तरुण-तरुणींना लागवडखड्ड्यांजवळ उभं राहायला सांगितलं. संजय सपकाळ आणि इतर जाणकारांच्या मार्गदर्शनाखाली ते प्रत्यक्ष काम करत होते. एका बाजूला बांधाच्या पलीकडे प्रौढ पिढी उभी होती. समोरच्या मोठ्या पट्ट्यात, लागवडखड्ड्यांच्या अगदी जवळ, हातात रोपं घेऊन तरुण पिढी उभी होती. मोठी माणसं त्यांच्याकडे पाहत होती. आणि ती तरुण मुलं-मुली मातीमध्ये उद्याचा आकार शोधत होती. आयोजकांनी ऐनवेळी दाखवलेल्या व्यवस्थापन कौशल्याचा तो भाग असेल, पण ते दृश्य मनाला हलवून गेलं. जणू एक पिढी म्हणत होती, ही पृथ्वी आम्ही तुमच्या हातात दिली आहे आणि पुढची पिढी उत्तर देत होती, आता पुढचं आम्ही पाहतो. त्या क्षणी 'भविष्य' हा धूसर शब्द वाटला नाही. ते समोर उभं होतं. माती लागलेल्या हातांनी.

माणसं आणि व्यवस्था लाखो-कोट्यवधी वर्षांत घडलेली जंगलं काही महिन्यांत नाहीशी करत असताना पुढे काय होईल, ही चिंता मला अनेकदा सतावत असते. डोंगर जळत आहेत, जंगलं कमी होत आहेत, तलाव बुजवले जात आहेत. तरी त्या सकाळच्या दृश्याने या चिंतेची धार काहीशी कमी केली.

देशी वृक्षांनी समृद्ध झालेलं स्वप्न एका पिढीपुरतं राहणार नाही, असं वाटलं. योग्य ज्ञान, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष कामाची संधी मिळाली, तर पुढची पिढी ही पृथ्वी केवळ वारसा म्हणून स्वीकारणार नाही. ती अधिक सुंदर करून पुढे देण्याचा प्रयत्न करेल. ठरल्याप्रमाणे सगळी झाडं त्या दिवशी लावली गेली नाहीत. पण जितकी लावली गेली, तितक्यांकडे अधिक वेळ, अधिक लक्ष आणि अधिक काळजी गेली. कमी झालेली संख्या त्या दिवशी पराभव वाटली नाही. घाईपेक्षा जगण्याची शक्यता मोठी ठरली. Less is more म्हणतात ते हेच!

त्या दोन दिवसांतील अनेक गोष्टी काळानुसार विसरल्या जातील. लागवडखड्ड्यांजवळ उभ्या असलेल्या त्या तरुणांचं दृश्य मात्र माझ्या मनातून जाणार नाही. त्या दिवशी माझ्या मनातील एक इच्छा अधिक स्पष्ट झाली. अक्षर मानवची ओळख देशी झाडं वैज्ञानिक पद्धतीने लावणारी, ती जगवणारी आणि या कामासाठी गावागावांत

माणसं जोडणारी संघटना अशीही व्हावी. _झाडं लावणारी फौज_ हा विभाग माणूस आणि निसर्ग यांच्यातील नात्याचं प्रत्यक्ष, जिवंत रूप व्हावा.

झाडं किती लावली, याची संख्या सांगण्याइतकंच ती किती जगली, किती वाढली आणि किती पिढ्यांना सावली देऊ लागली, हे पाहणं महत्त्वाचं ठरावं. प्रत्येक ठिकाणच्या माती-पाण्याला साजेशी देशी झाडं निवडली जावीत. रोप लावणाऱ्या हाताने त्याच्या पुढच्या जगण्याचीही जबाबदारी घ्यावी. या पहिल्या झाड संमेलनाचं खरं यश कार्यक्रमाच्या शेवटी दिसलं. रावेत येथील श्री. भास्कर गोखले यांनी आपल्या परिसरात असं झाड संमेलन घेण्याची इच्छा व्यक्त केली. अक्षर मानवचे महाराष्ट्र राज्य संघटक सुजित चव्हाण यांनीही रावणगावमध्ये असा उपक्रम आयोजित करण्याचा संकल्प मांडला. दोन माणसांनी तो विचार उघडपणे बोलून दाखवला. पण तिथे उपस्थित असणाऱ्या जवळपास प्रत्येकाच्याच मनात तो संकल्प रुजला होता ह्याची मला खात्री आहे.

एका झाडातून अनेक बिया जन्म घेतात आणि त्या बियांतून नवी झाडं उभी राहतात. एका झाडाच्या आत पुढच्या जंगलाची शक्यता दडलेली असते. तसंच हे पहिलं झाड संमेलनही स्वतःपुरतं थांबणार नव्हतं. गावागावांत होणाऱ्या पुढच्या झाड संमेलनांची, वैज्ञानिक पद्धतीने होणाऱ्या वृक्षलागवडीची आणि लावलेल्या झाडांना वर्षानुवर्षं जपणाऱ्या नव्या समूहांची शक्यता त्यात दडली होती.

मनगावहून पुण्याच्या दिशेने परत निघालो, तेव्हा आमच्या गाडीत गप्पाटप्पा सुरू होत्या. दोन दिवसांच्या आठवणी, भेटलेली माणसं, झालेल्या गंमतीजमती, सगळं बोलणं चाललं होतं. माझ्या डोळ्यांसमोर मात्र एकच दृश्य पुन्हा पुन्हा तरळत होतं. लागवडखड्ड्यांजवळ उभी असलेली तरुण पिढी. त्यांच्या हातांनी लावलेली रोपं. आणि बांधाच्या पलीकडून त्यांच्याकडे पाहणारी मोठी माणसं. वर्षानुवर्षं मनात राहिलेली एक चिंता त्या दृश्याने थोडी हलकी केली होती. पुढे झाडांचं काय होईल? पुढच्या पिढीचं काय होईल? या दोन प्रश्नांची उत्तरं त्या दिवशी पूर्णपणे मिळाली असं नाही, मात्र आता खूप मोठा धीर मिळाला होता.. एक मोठी आशा दिसली होती.

परतीच्या प्रवासात झाड संमेलनातून येणाऱ्या अनेकांच्या डोळ्यांत भविष्यातली देवराई आकार घेत होती. मनगावच्या मातीत, तिथे जमलेल्या सगळ्यांच्या हातांनी, उद्याची सावली रुजली होती..

**अजिंक्य किन्हीकर**
राष्ट्रीय अध्यक्ष, अक्षर मानव, भारत



# माझाही खारीचा वाटा ...

**कल्पना उबाळे**
कार्यवाह, अक्षर मानव महाराष्ट्र

अक्षर मानव तर्फे झाड संमेलन हे दिनांक 25 आणि 26 जुलै 2026 रोजी मनगाव, देहरे अहमदनगर येथे श्री सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले. अक्षर मानव ही संघटना नेहमीच जगण्याच्या विविध पैलूंना स्पर्श करणारे असे कार्यक्रम घेत असते. 'झाड संमेलनही' त्यातलेच. खरंतर झाड संमेलन या नावातच तसे वेगळेपण दडलेले आहे आपण नेहमी बघत असतो की संमेलनही नेहमी माणसांची भरवली जातात पण झाडांनाही माणसाचा दर्जा देऊन त्या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला झाड संमेलन हे नाव देऊन अक्षर मानव ने झाडांचे आपल्या आयुष्यात असणारे अनन्यसाधारण महत्त्वच अप्रत्यक्षरीत्या अधोरेखित केलेले आहे. या झाड संमेलनामध्ये वृक्षदूत असणाऱ्या सयाजी शिंदे यांचे उपस्थितीमध्ये थोडी थोडकी नव्हे तर तब्बल 1000 वृक्षारोपणाचा कार्यक्रम अक्षर मानव ने घेतला. वृक्ष ही केवळ रोपणच केली नाही तर त्याचे संगोपनही केले जावे यावरही अक्षर मानव कटाक्षाने लक्ष देत असते. आजच्या काळामध्ये वृक्षारोपणाची गरज ही आपल्यापासून लपून राहिलेली नाही आहे त्यामुळे 25 जुलै चे हे झाड संमेलन ही तर केवळ सुरुवात आहे आणखीन अशाच प्रकारची अनेक संमेलने अक्षर मानवला भरवायची आहेत.

तसेच या संमेलनामध्ये झाडांचे महत्त्व सांगणारी रिल स्पर्धा ही पण कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य ठरलेली आहे. आपलं भविष्य आता उद्याच्या पिढीकडेच आहे त्यामुळे बालकांनाही झाडाचे महत्व समजावं व त्यांनी व्यक्त व्हावं असा दुहेरी उद्देश ठेवून ही रील स्पर्धा घेण्यात आली आणि त्याला महाराष्ट्रातून भरभरून प्रतिसाद मिळाला. या रिल स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रांचे वाटप कार्यक्रमात करण्यात आले.

राजन खान म्हणजे आमचे गुरुजी या अवलियाने सुरू केलेली अक्षर मानव ही संघटना हळूहळू गुरुजींनी पाहिलेल्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अधिक सक्रिय होत आहे आणि माझाही त्यात खारीचा वाटा आहे याचा मला अतिशय आनंद आहे.



झाडांचे महत्त्व सांगणारी रिल स्पर्धा ही पण कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य ठरलेली आहे. आपलं भविष्य आता उद्याच्या पिढीकडेच आहे त्यामुळे बालकांनाही झाडाचे महत्व समजावं व त्यांनी व्यक्त व्हावं असा दुहेरी उद्देश ठेवून ही रिल स्पर्धा घेण्यात आली

# साहित्य, संस्कृती, झाड आणि माणूस - एक अनोखा संगम

**स्वाती पवार राणे**

अंबरनाथ

अक्षर मानव आणि माऊली प्रतिष्ठान या दोन्ही संस्थांच्या एकत्र समन्वयाने झाड संमेलन सोहळा नुकताच अहिल्यानगर मनगाव येथे 25 व 26 जुलै रोजी पार पडला.

या सोहोळ्याचे औचित्य साधून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून बरेचजण उपस्थित होते. झाड संमेलनाचे आयोजन अतिशय सुरेख झाले. माननीय सयाजी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाला चारचांद लावले. त्यांनी दिलखुलास शब्दात झाडांचे आपल्या सर्वांच्या जीवनात किती महत्व आहे ते पटवून दिले. आपण नेहमीच बघतो की जे पडद्यावर खलनायक साकारतात ते खऱ्या आयुष्यात कितीतरी पटीने संवेदनशील माणूस असतात. संजय सपकाळ यांनी सयाजी शिंदे यांच्याबरोबर मुक्त संवाद साधला. मुलाखत अगदी खुमासदार झाली, उत्तरोत्तर रंगत गेली. त्यानंतर फोटो सेशन संपतच नव्हते.

रात्रीचे स्नेहभोजन सुरेख झाले. लापशी तर सगळ्यांनाच आवडली. आताच्या बफे पद्धतीला बगल देऊन पूर्वीची पंक्तीची जेवण पद्धतीने वाढल्यामुळे खूपच छान झाले आणि ताटात काहीच सांडू नये हा तिथला नियम राजेंद्र धामणे सरांनी सांगितला त्यामुळे एकदम उत्तम झाले.

अन्नाचा अपव्यय करू नये हे खरेतर कोणालाच सांगावे लागू नये. हे व्रत आपण प्रत्येकाने स्वतःचं अंगीकारले पाहिजे.

भोजनानंतर सुदंर वाद्यवृंदांचा कार्यक्रम झाला. अनेक मराठी हिंदी गाणी म्हटली.अनिल जाधव आणि अनिल सपकाळ यांनी सुदंर नृत्य करून गाण्याच्या कार्यक्रमाची शोभा वाढवली. आमच्या अंबरनाथ, उल्हासनगर ग्रुपबरोबर आलेल्या उमा डोळस यांनी ' मळ्याच्या मळ्यामध्ये कोण ग उभी ' या दादा कोंडके यांच्या सुरेल गाण्याची फर्माईश केली आणि त्यांनी थोडेसे नृत्य सादर करून छान करमणूक केली. त्यानंतर कवितांचा कार्यक्रम झाला. खरेतर दिवसभराचा प्रवासाचा शीण करून रात्री उशीरा जास्त कोणाची थांबायची तयारी वाटत नव्हती, पण शंकर कदम यांनी खुमासदार शैलीत कविता कार्यक्रमाची रंगत वाढवली.

सर्वात पहिली कविता म्हटलेल्या बालकवीने खणखणीत आवाजात हावभाव सहित कविता सादर करून सगळ्यांची मरगळ उडवून टाकली. वासुदेव आणि मेंढपाळाचा गेटअप घेऊन कविता सादर केली त्यांनी तर खूपच रंगत आणली. अनिल सपकाळांनी पण छान कविता सादर केली. सुचेता धामणे ताईंना कविता खूपच आवडली. इतर कवी कवयित्रींनीही सुदंर कविता सादर केल्या. रात्री साडेअकरानंतर सगळे आपापल्या व्यवस्था केलेल्या ठिकाणी निद्राधीन होण्यासाठी परतले. आम्हाला कोणाला सुनियोजन करणाऱ्या पडद्या मागच्या कार्यकर्त्यांचा थांगपत्ताही लागला नाही.

दुसऱ्या दिवशी सगळे परत ठिक नऊ वाजता कार्यक्रम स्थळी पोहोचले. आलेल्या सगळ्यांचा थोडक्यात परिचय झाला. चहा आणि अल्पोपाहार घेऊन सगळे ताजेतवाने झाले. नंतर सगळे वृक्षारोपण ठिकाणाजवळ गेले. जाताना वाटेत माऊली प्रतिष्ठान मनगाव परीसरात असलेले समृद्ध वातावरण बघत गेलो. विविध जातीच्या गाई, बकऱ्या बघितल्या. शेती, झाडे यांची सुदंर लागवड केलेली बघितली. वृक्षारोपण ठिकाणी संजय सर, ज्ञानेश्वर सर यांनी वृक्षारोपण करताना पुढे झाड वाढल्यावर वृक्षांची गर्दी होऊ नये म्हणून आखणी करत वृक्षारोपण सोहळा छान पार पाडला. छोटा श्रवण याचे वयाच्या मानाने झाडांचे असलेले ज्ञान पाहून थक्क व्हायला झाले. त्यानंतर दुपारचे चविष्ट भोजन घेऊन एकमेकांचा निरोप घेत सगळे आपापल्या घरी परतीच्या प्रवासास निघाले.

मनगाव माऊली प्रतिष्ठान डॉक्टर राजेंद्र सर आणि डॉक्टर सुचेता धामणे मॅडम या उभयतांनी समाजातील प्रतिकूल परिस्थितीला तोंड देणाऱ्या अनेक माता भगिनी आणि मुलांचा सांभाळ करत त्यांना समाजात एक स्थान मिळवून देत नावाप्रमाणेच सगळ्यांचे माऊली झाले. त्यांच्या कार्याला तोड नाही.

आपण सर्वसाधारण लोक आपलेच दुःख कुरवाळत जगत असतो, अशा वेळेस पुढे येऊन इतरांना आधार देणे ही सोपी गोष्ट नाही. राजेंद्र सरांनी मनमोकळेपणे त्यांनी केलेल्या कार्याबद्दल थोडक्यात सांगितले. त्यावेळेस त्यांच्या शब्दात परत परत उल्लेख करत होते आपण काहीच मोठे कार्य केले नाही. जे मनाला वाटले ते करत गेलो आणि सत्कार्य करताना आपोआपच चांगल्या गोष्टी घडत जातात.

दोन्ही उभयतांचे प्रसन्न हास्य आणि सरांची घरगुती स्वरूपातील सुती पांढराशुभ्र कपड्यातील वेशभूषा आणि मॅडमना कॉटन साडीत बघून साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या गोष्टीचा प्रत्यय आला. यावेळेस गुरूजींची अनुपस्थित प्रकर्षाने जाणवली. अरूण मापारी यांचीही कमी जाणवली.

मी स्वाती पवार राणे अंबरनाथ स्थित अक्षर मानवचे आतापर्यंत चार पाच संमेलनात हजेरी लावली आहे. प्रत्येक वेळेस नवीन शिदोरीत भर पडते, नवनवीन मित्रपरिवारांची वाढ होते. आपल्या आयुष्यात वेगवेगळे उद्योग करत जीवन घडवणारे नवनवीन लोक भेटतात. आपल्या ज्ञानात भर पडत जाते. मन प्रसन्न होते. नवनवीन माणसांची ओळख करुन घेणे ही माझी आवड अजून वृद्धिंगत होत जाते.



अक्षर मानव आणि माऊली प्रतिष्ठान या दोन्ही संस्थांच्या एकत्र समन्वयाने झाड संमेलन सोहळा नुकताच अहिल्यानगरजवळ मनगाव येथे 25 व 26 जुलै रोजी पार पडला. या सोहळ्याचे औचित्य साधून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून बरेचजण उपस्थित होते.

# झाडांशी नाते जोडणारे अक्षर मानव झाड संमेलन

**रमा गिरी**
अक्षर मानव बाल विभाग संचालक

"पृथ्वीवर झाडे आहेत म्हणून आपण आहोत." या जाणिवेतून अक्षर मानवने यंदापासून 'अक्षर मानव झाड संमेलन' या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली. माणूस आणि निसर्ग यांच्यातील नाते अधिक दृढ व्हावे, झाडांप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी आणि वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जाणीव समाजात रुजावी, या उद्देशाने २५ व २६ जुलै २०२६ रोजी मनगाव, देहरे, जिल्हा अहमदनगर येथे हे संमेलन उत्साहात पार पडले.

माऊली सेवा प्रतिष्ठान, सह्याद्री देवराई, वसुंधरा फाऊंडेशन आणि फेन्सकोट इंजिनीअर्स यांच्या सहभागातून आयोजित या संमेलनाला निसर्गप्रेमी, साहित्यिक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि अक्षर मानव परिवारातील सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मनगावची निवडही विशेष अर्थपूर्ण होती. डॉ. राजेंद्र धामणे आणि डॉ. सुचेता धामणे यांच्या माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून लैंगिक अत्याचारातून मनोरुग्ण झालेल्या महिला आणि त्यांच्या अपत्यांची मायेने सेवा केली जाते. माणुसकीची सावली देणाऱ्या या परिसरातच वृक्षलागवडीचा उपक्रम राबविण्यात आला.

२५ जुलैच्या संध्याकाळी झाडांविषयी शॉर्ट फिल्म, कविता, गाणी आणि संवाद असे कार्यक्रम झाले. संमेलनाचे प्रमुख पाहुणे अभिनेते व वृक्षदूत सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष ऊर्जा मिळाली.

२६ जुलैच्या सकाळी संमेलनातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे एक हजार रोपांचे सामूहिक रोपण. केवळ झाडे लावणे नव्हे, तर ती जगवणे आणि पुढील पिढीला पर्यावरणाबाबत सजग करणे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**बालक-पालक रील स्पर्धेचा आगळा प्रयोग**

या संमेलनाच्या निमित्ताने अक्षर मानव बाल विभागाने १४ वर्षांखालील मुलांसाठी 'झाडांचे महत्त्व' या विषयावर बालक-पालक रील स्पर्धा आयोजित केली होती. डिजिटल माध्यमाचा सकारात्मक वापर करून मुलांनी पर्यावरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, हा त्यामागचा उद्देश होता.

या स्पर्धेतील सहभागी बालकांच्या उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी झालेल्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याला मा. रमेश खरमाळे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीत मुलांचा



गौरव करण्यात आला. अशा उपक्रमातून मुलांना पर्यावरणाशी जोडण्याबरोबरच त्यांच्या सर्जनशीलतेलाही व्यासपीठ मिळाले. अक्षर मानव संघटक सुजीत चव्हाण , अक्षर मानव राष्ट्रीय अध्यक्ष अजिंक्य किणीकर, अक्षर मानव राज्य अध्यक्ष अरुण मापारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही रील स्पर्धा कमीतकमी वेळात लोकांपर्यंत पोहचली आणि तिला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अक्षर मानव बाल विभागातील सर्व सदस्यांनी या रील स्पर्धेच्या माध्यमातून झाडांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी प्रयत्न केले.



**राजन खान गुरुजींच्या व्यापक विचारांची दिशा**

अक्षर मानवचे संस्थापक राजन खान गुरुजी यांच्या व्यापक सामाजिक आणि माणुसकीच्या विचारातून हा उपक्रम आकाराला आला आहे. माणूस, समाज, साहित्य, कला आणि निसर्ग यांना परस्परांपासून वेगळे न पाहता त्यांच्यातील नाते जपण्याचा प्रयत्न अक्षर मानवच्या विविध उपक्रमांतून होत असतो. ‘झाड संमेलन’ ही त्याच विचाराची कृतीशील अभिव्यक्ती आहे.

आजची वृक्षतोड पाहता पुढच्या पिढीला आपण काय देणार, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. वृक्षतोड थांबवण्याबरोबर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन हीही आपलीच जबाबदारी आहे.

अक्षर मानव झाड संमेलनाने विचार, कला आणि कृती यांचा सुंदर संगम घडवला. कविता, गाणी, रील आणि संवादातून पर्यावरणाचा संदेश देतानाच प्रत्यक्ष एक हजार झाडे लावण्याची कृती झाली.

झाड लावणे म्हणजे केवळ एक रोप मातीत रोवणे नव्हे; तर पुढच्या पिढीसाठी आशेची सावली निर्माण करणे होय.



अक्षर मानवाच्या उपक्रमांमध्ये नवनवीन लोकांशी ओळखी होतात आणि कुटुंब विस्तारात जाते


आयोजक
FENCECOAT
अक्षर मानव
झाड संमेलन
एक संवाद... झाडांशी

# समाज

**कल्पना उबाळे**

आज-काल कशाचंच काही वाटेनासे झाले आहे. मी स्वतः च चकीत झाले आहे. एवढे कसे मुदाड झाले आहे मन. कुणाला जिवंत जाळले जाते, कुणाची मुस्कटदाबी सुरू आहे. अनोळखी-ओळखीच्या माणसांचा एकमेकांना एवढा धोका कधी निर्माण झाला. कुठुण आली एवढी बधीरता. या बधीरतेमुळे कधीकाळी आपण संवेदनशील होतो का? हा प्रश्नच निर्माण झाला आहे. आधीच एवढ्या नैराश्याने ग्रासलेल्या स्थितीत जेथे अख्ख्या मानवजातीचेच अस्तित्वच पणाला लागलेले आहे त्या काळात एकमेकांशी सहिष्णू रहायचे सोडून रोज उठले तर काय दिसते तर सामूहिक बलात्कार, खून, दरोडे, जमावाने घेरून एखाद्याला मारून टाकणे, आत्महत्या जणू काही माणूस हा दारूगोळ्याच्या ढीगावर बसून काडीपेटी ओढण्याचा प्रयत्न करतोय.

स्वविनाशाकडे मानवजात कधी नव्हे ते एवढ्या वेगाने मार्गक्रमण करीत आहे. याची कारणमीमांसा करताना मला एक गोष्ट राहून राहून वाटते की समाज हा स्त्री-पुरूष, तरूण-म्हातारे या मध्ये विभागलेला नसून 'आहे रे' व नाही रे' या गटात विभागला गेला आहे. अर्थशास्त्राच्या नियमानुसार जेव्हा आहे रे आणि नाही रे या दोन गटाधील दरी वाढत जाते तेव्हा समाजामध्ये भिषण उलथापालथ घडून येते. आपण सगळीकडे पाहतो झोपडपट्ट्या, मुलभूत सुविधा नसणार्या वस्त्या या सर्वांमध्ये अतिशय कॉमन असणारी गोष्ट म्हणजे छपरावर असणारा डिश अटेना नाही रे समाज स्वतः त्या ताटातली भाकरी खाताना टिव्ही वर गडगंज श्रीमंतांच्या लग्नातील श्रीमंतीचे ओंगळवाणे प्रदर्शन पाहत राहतो. आपल्याला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असताना काही लोक करीत असलेल्या अन्नाची नासाडी पाहून त्यांच्या डोक्यात तिडीक गेल्याशिवाय राहणार नाही. कोणी म्हणेल की आहे रे गटाने त्यांच्या मेहनतीने हे सर्व कमावले आहे, ते मान्यच आहे, पण आजकाल समाजामध्ये ज्या प्रकारे सर्व गाष्टीचें ओंगळवाणे प्रदर्शन सुरू आहे ते मानव्य रित्या योग्य नाही आणि यातूनच पुढील गुन्हेगारीची बिजे रोवली जातात. पाच हजारासारखी रक्कम घेऊन एखाद्याला संपवायला देखील लोक कमी करत नाहीत, कारण त्यांच्यासाठी ती रक्कम एखाद्याच्या जीवापेक्षा खूप महत्त्वाचे असतात. तरूणांच्या हाताला काम नाही पण डोक्यामध्ये फ्री असणारा इंटरनेटचा डेटा कसा संपवावा याचा घोर मात्र आहे. स्वत: त्या चंद्रमौळी झोपडीत बसून दुसऱ्याच्या महालात सहज डोकावून बघता येते. मग स्वतः लाच तेथे मानून स्वप्नरंजनात समाज रंगतो. मग हे आपल्याला का मिळू नये? सहज मिळत नसेल तर हिसकावून का घेऊ नये? यातून निर्माण होणारी हिंसकता ही अतिशय चिंताजनक आहे. म्हणूनच मला वाटते की आहे रे म्हणजे सर्वकाही असणारे आणि नाही रे म्हणजे मुलभूत सुविधा सुद्धा नसणारे यातील दरी जितकी वाढेल तितक्या तीव्रतेने अखिल मानव जातीचा विनाश अटळ आहे

त्याला जबाबदार माणूसच असणार आहे.

***

# अक्षर मानव भाषा शिकवणीवर्ग

अक्षर मानव जगण्यातील नव्वद विषयांवर अभ्यास करतं आणि त्याच्या कृतिशील अंमलबजावणीसाठी कृतिशील विभाग सुद्धा चालवतं. भाषा हा त्यातीलच एक महत्वाचा विषय आहे. हा विषय जगातील प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा मूलभूत भाग होऊन बसला आहे. याचं महत्व ओळखून आणि जगातील या शिक्षण व्यवस्थेचा झालेला बाजार लक्षात घेऊन अक्षर मानवने ऑनलाईन भाषा शिकवणी वर्ग चालू केले. भविष्यात हे वर्ग ऑफलाइन पद्धतीने चालवण्याचा मानस आहे.

शिकवणी वर्गामध्ये दर वर्षी शेकडो विद्यार्थी भाषा शिकतात. त्यातील काहींना परदेशात शिक्षणासाठी, नोकरी साठी किंवा पर्यटनासाठी सुद्धा या शिकलेल्या भाषांचा उपयोग होतो आहे.

भाषा ही संवादाची मुख्य गरज आहे आणि त्यामुळे अक्षर मानवकडून यावर गांभीर्याने परंतु खेळीमेळीच्या वातावरणात वर्ग चालवले जातात.

या शिकवणीवर्गाची दुसरी जमेची बाजू अशी की, जे शिक्षक आणि विद्यार्थी ही जाणतात त्यांना आंतरराष्ट्रीय साहित्याचा देखील अभ्यास करता येतो आणि आपलं साहित्य त्या भाषेमध्ये भाषांतरित करता येतं. यामुळं आपण मर्यादित वर्तुळातील आहोत हे न्यूनगंड निघून जातो आणि एक समाधानकारक मानसिकता तयार होऊन आपण ज्ञानी असल्याचा आनंद घेता येतो.




मी या शिकवणी वर्गाचा समन्वयक म्हणून मला राज्यभरच्या माणसांसोबत संवाद करण्याची संधी मिळते. त्यातून परिचय होतात आणि कुटुंब वाढीची भावना माझ्या मनात निर्माण झाली आहे. या शिकवणीवर्गात शिकण्याची फक्त एकच अट आहे की आपल्याला मराठी लिहिता, वाचता आणि बोलता आलं पाहिजे. मग जर तुम्हाला जगातील कोणतीही भाषा शिकण्याची आवड असेल तर तुम्ही शिकू शकता. त्यासाठी वयाचं कसलंही बंधन नाही.

जर आपल्याला भाषा शिकायच्या असतील आणि व्यावसायिक पातळीवर अक्षर मानवच्या नियोजनानुसार सोबत काम करायचं असेल, तर कृपया आपण मला 9527212233 या नंबरवर वॉट्सअप्प मेसेज करा.

धन्यवाद!

**सुजित कल्पना मारुती.**
संघटक आणि शिकवणीवर्ग समन्वयक, अक्षर मानव महाराष्ट्र
9527212233

# संगीत रजनी

संगीत ही मानवी मनातील एक कोमल भावना आहे. जशा श्रावणसरी तप्त धरतीवर बरसून तिला शीतलता देतात अगदी तसेच संगीत हे होरपळलेल्या मनावर फुंकर घालायचे सामर्थ्य ठेवते.

हे सामर्थ्य जाणून घेऊन अक्षर मानव ह्या संस्थेने म्युझिक थेरपी शिकण्यासाठी ऑनलाईन क्लासेस सुरू केले. ह्या म्युझिक थेरपीच्या शिक्षिका म्हणून डॉ. रजनी आपसिंगेकर ताई आम्हाला लाभल्या. डॉ. रजनी ताई ह्याचे व्यक्तिमत्व एवढे प्रभावी, प्रसन्न आणि प्रेमळ आहे की त्यांचे रसाळ वाणी मधील लेक्चर कधी चालू व्हायचे आणि क्लास संपायची वेळ कधी येऊन ठेपायची हे कोणालाही समजायचे नाही. डॉ. रजनी ताई ह्यांनी त्यांच्या प्रेमळ स्वभावाने सर्वांनाच अगदी आपलेसे केले.

**विद्या पवार**
संचालक, अक्षर मानव संगीत विभाग

डॉ. रजनी ताई ह्यांनी आम्हाला सांगितले की म्युझिक थेरपी ही विशेषतः अमेरिकेत एक पर्यायी आणि वैकल्पिक मेडिकल कोर्स म्हणून मान्यता पावलेली थेरपी आहे. तो कोर्स केल्यानंतर त्या व्यक्तीला डॉक्टर ही पदवी मिळते. रीतसर रजिस्ट्रेशन नंबर सुद्धा मिळतो आणि तो पेशंट वर उपचार सुद्धा करू शकतो.

आपल्या भारतात सुद्धा म्युझिक थेरपी शिकवून ट्रेनिंग देणाऱ्या संस्था चेन्नई, दिल्ली, मुंबई, बंगलोर आणि वाराणसी या शहरात आहेत. ह्या शाळा/संस्था म्युझिक थेरपी मध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा आणि शॉर्ट टर्म कोर्स शिकवतात.

अक्षर मानव ह्या संस्थेचा एक मूलमंत्र आहे की जगातील सर्व मानवाने सुखी राहावे, ताणमुक्त जीवन जगावे. हे प्रत्यक्षात आणण्याचा वसा अक्षर मानव ह्या सामाजिक संघटनेने घेतला आणि म्हणूनच म्युझिक थेरपी सारखा शिकवणी वर्ग चालू करायचे धाडस दाखवले. ज्या मधे भारतीय शास्त्रीय संगीतातील गायलेले वेगवेगळे राग, बासरी, सतार, तबला, ढोलक, सनई, पेटी, गिटार, सारंगी इत्यादी वाद्यावरील राग आणि निसर्गातील अनेक सुंदर कानाला मंजुळ वाटणारे ध्वनी ह्या सर्वांचा समावेश आहे. अनेक योगमुद्रांचा वापर आहे. संगीतातील सात सुरांचा वापर आहे. संगीतातून ध्यानाकडे वळण्याचा वापर आहे. ह्या थेरपी द्वारे आपण माणसाच्या शारीरिक आणि मानसिक व्याधींवर उपचार करतो. त्यांना औषध म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या रागदारीचे डोस दिले जातात. ध्वनी स्नान, ध्वनी स्वप्न, ओंकार ध्यान, मंत्र ध्यान इत्यादी दिले जाते. हे ऐकताना प्रत्येक जण जणु ह्या संगीताच्या सात सुरांवर आरूढ होऊन एका वेगळ्याच अलौकीक दुनियेत पोहचतो आणि आपल्या सर्व चिंता, व्याधी विसरून जातो आणि त्यातूनच आपले शरीर स्वतःला बरे करण्याची ताकद निर्माण करू लागते. शरीरातील बिघडलेला हार्मोन्स चा तोल सांभाळायला लागते.

ह्या शिकवणी वर्गाचे अजून एक वैशिष्ट म्हणजे इथे सर्वांनी डॉ. रजनीताई ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पेशंटवर स्वतः उपचार केलेले आहेत आणि त्यांना त्या आजारातून बरे करायचेच हा वसा घेतलेला आहे. ह्या मधील आश्चर्याची बाब म्हणजे आमच्या पेशंटमध्ये एका नुकत्याच जन्माला आलेल्या चिमुकल्या बाळापासून ते पॅरालिसिस झालेल्या प्रौढ व्यक्ती पण आहेत. सर्वजण अगदी मनापासून त्यांना बरे करायचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मुखातून आम्हा प्रत्येकासाठी आलेले आशिर्वाद हे आम्हाला खरच सुखावून जात आहेत. म्हणूनच हा शिकवणी वर्ग चालू ठेवून वेगवेगळ्या केस स्टडी करून त्याचे संकलित पुस्तक तयार करावे असे आम्ही म्युझिक थेरपी च्या सर्व विद्यार्थ्यांनी ठरवले आहे.

अक्षर मानवने सर्व माणसांना सुखी करण्याचा जो वसा आम्हाला दिलेला आहे त्या कडे आमचे हे पहिले पाऊल पडत आहे संगीता द्वारे आणि डॉ. रजनी ताई ह्यांच्या द्वारे.

# शिकवणीवर्गाच्या विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया

**प्रिय रजनीताई,**

आपला क्लास आता संपत आला आहे आणि तुम्ही आता ठरल्या वेळेला दिसणार नाही बोलणार नाही याचे वाईटही वाटत आहे. पण तुम्ही केव्हाही फोन करा मी भेटेन मी बोलेन कबूल केल्यामुळे जरा बरे वाटले..

रजनी ताई गाणं आम्ही लहानपणापासूनच ऐकत आलो आहोत गात आलो आहोत, गाणे ऐकल्याने, गायल्याने छान वाटते, बरे वाटते हे अनुभवले आहे. तुमच्या शिकवण्याने गाण्याने छान का वाटते हे कळले. गाण्याचा, मंत्रांचा आपल्या शरीरातील चक्रांवर व त्यांना जोडलेल्या अवयवांवर काय परिणाम होतो हे छान कळले. आता गाणे सजगतेने म्हटले आणि ऐकले जाईल. आपल्याला कळले की विशेषता मुलांना राम रक्षा पठण, मंत्र म्हणण्याचा कंटाळा येतो पण या सर्वांचा त्यांच्या चक्रांवर व त्या संबंधित अवयवांवर काय परिणाम होतो हे जर त्यांना समजून सांगितले तर विनासायास ते ती करतील. आपली पुढली पिढी निरामय होण्यास त्याचा खूपच हातभार लागेल.

निवृत्ती नंतर काय करावे? वेळ जात नाही! करमत नाही! अशा सर्वांनाच ही "संगीतोपचार" थेरेपी खूपच उपयोगी आहे. स्वतःवर उपचार करता येतीलच शिवाय घरातले, आसपासचे मित्र मैत्रिणी यांच्यावर देखील उपचार करता येतील. ज्यांना समाजसेवा करायची आहे त्यांना तर ही फारच छान संधी आहे.

रजनी ताईंनी आम्हाला जी माहिती दिली ती खरोखरच अनमोल आहे. ताईंचा अभ्यास, विषय समजून देण्याचे कौशल्य, वागणे, बोलणे व प्रसन्न व्यक्तिमत्व हे सगळेच लाजवाब आहे.

आमच्या ग्रुपचे सर्वजण जागरूक असल्याने त्यांनी वेळोवेळी जे प्रश्न विचारले त्यामुळे अजूनही खूप छान माहिती मिळाली शिवाय ताईंनीही वेगवेगळी माहिती आम्हाला पाठवली. ताईंने असेच क्लास घेतले तर इतर सर्वांनाच ते खूप उपयोगी आहेत तेव्हा आपण सर्वांनाच कळकळीने सांगू की तुम्ही हा क्लास जॉईन करा.

शेवटी म्हणूया की,

"मोजता येत नाही मापाने एवढे वैभव दिलेय ताईने" तेव्हा हे वैभव वाढवून अजून श्रीमंत होण्याचा आपण प्रयत्न करूया!

Thank you for being our guide, the mentor and inspiration

**मीरा शुक्ल.**

# सभागृह अजून भरलेले आहे...

दुर्योधन बदलले
दुःशासन बदलले
चेहरे बदलले
पण अखंड मौन
आणि गांधारीमय प्रेक्षक
अजूनही तिथेच आहेत

सगळेच इथं वस्त्रहरण करत आहेत
कौरव अन् पांडवही

फरक इतकाच
काही वासनांध डोळे
काही स्वार्थाने बरबटलेले हात
करत आहेत नि:वस्त्र व्यवस्थेला
तर काही
मौनातले सापळे
हातावर ठेवून हात मूग गिळून बसलेत

प्रश्न इथे दुर्योधनांचा नाही

प्रश्न आहे भीष्मांच्या मौनाचा, द्रोणांच्या तटस्थतेचा आणि विदुरांच्या असहायतेचा

आजही
जन्माला येणारा प्रत्येक
नवा कोवळा जीव
कृष्णाची वाट पाहत आहे
असहाय्यपणे साद घालत आहे

द्रौपदीच्या त्या वेदना प्रत्येक जीव कमीअधिक प्रमाणात भोगत आहे

पण त्या वेदना धगधगत
टाहो फोडत राहतील
अशाच जिवंत राहतील
कारण मौनाचे सभागृह अजूनही भरलेले आहे

दुर्योधनापेक्षा
मला आता त्या सभागृहाची
भीती वाटते

जिथे अन्यायापेक्षा
मौन अधिक असते

**सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा**

# डिप्रेशन

"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाही
फक्त इतकंच
निशा तळमळत असते बदलत कुशी
निद्रा जागत असते भिजवत उशी
दिशाहीन चंद्र एकटाच फिरतो
चांदणं करपलेल्या आकाशी.
"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाही
फक्त इतकंच

सहनही होत नाही
सांगताही येत नाही
न पेलणाऱ्या दुःखाच ओझं
कुण्या भिंतीलाही टांगता येत नाही

"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाह
फक्त इतकं

शरीराचा प्रत्येक अवयव नांगी टाकतो
मनावर आक्रमक होतो भूतकाळ
तहान,भूक जाणिवा संपावर जातात
विचार संस्कार सोडून भरकटत जातात नकारात्मकतेकडे
आषाढ कार्यरत असतो गालावर बरसायला
"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाही
फक्त इतकंच

पहाटेचा उगवणारा सूर्यही काही सभ्य नव्हे
किरणं आक्रमक होतात मनावर
उकरून टाकतात सारवलेलं अंगण आपल्या 200 डिग्री
व्होल्टेज चा शॉर्ट लावून
"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाही
फक्त इतकंच

पायाखालील मुंगीची हत्या न करणारा तो मग उभा राहतो
स्वतःहून मृत्यूच्या वळचणीला.
स्वतःच्या हत्येचा विचार करत
तिथे खुणावत असतात त्याला
फासाच्या दोरी
रेल्वेच्या पटरी
पाणी भरलेल्या विहिरी
आणि बॉटल जहरी
"डिप्रेशन"मध्ये गेल्यावर फार काही होत नाही
फक्त इतकंच

**कल्पना दिलीप मापुसकर**
मीरारोड
9082646494

# अवसान

पोकळ आकाशात उसने मागून आणलेल्या चंद्र ताऱ्यांनी प्रकाश पडत नसतो
स्वतःच आत उजळून झळकायचं असतं डार्लिंग
जगण्याचा उत्सव करताना रद्दीची शेकोटी जाळून चालत नाहीं
घालावी लागतात स्वतःचीच हाडे आहुती म्हणून
द्यावे लागते आपल्याच रक्ताचे शिंपण तेव्हा कुठे मिळते जगण्याला कोंदन
निसरड्या वाटेवरून चालताना आवारावे लागते स्वतःलाच अहंकाराच्या गरतेतून
नाहीतर केवळ फसव्या शब्दांच्या बुडबुडयांनी आपणच जातो घेरून
नकळतच स्वप्रीतीचा लागतो ध्यास केवळ स्वतःच्याच प्रेमाची जीवाला आस
उधार उसन्या बळाचा काय तो माज करावा
निस्सीम निखळ सच्चा अशा एकाच
क्षणावर जीव ओवाळून टाकावा

**कल्पना उबाळे**

# श्रावणधारा

श्रावणधारा अशी बरसली
आनंदाने मीही बहकली
पोर कोवळी उदरामध्ये
दिसमासाने वाढु लागली

तिच्या येण्याने तृप्त भावना
नयनामध्ये साचू लागल्या
बोल बोबडे कानी पडता
रिमझिम पाऊस बरसु लागला

दिसमासाने पोर वाढली
पहिला नंबर काढू लागली
तिची बक्षिसे कौतुक पाहता
श्रावणधारा पुन्हा बरसली

नवे स्वप्न नव्या आशा
डॉक्टर होण्याची मनात नशा
नीट परीक्षा देण्यासाठी
कंबर छकुली कसु लागली

तिच्या स्वप्नांचा ऊंच झोका
आनंदाने झुलत होता
गगनालाही गवसणी घालायचा
प्रण तिने केला होता

तिच्या गरीब मायबापांनी
ठेवले होते शेत गहाण
आणि पोरीला शिकविण्याचे
करत होते कार्य महान

आता प्रत्येक क्षण छकुली
अभ्यासातच मग्न होती
डॉक्टर बनण्याचे स्वप्न
मनोमनी पहात होती

पण नियतीने खेळला क्रूर डाव
घातला मोठा वर्मी घाव
परीक्षा कॅन्सल झाली ऐकताच
घाबरून गेली छकुली जाम

डोळ्यासमोर नाचू लागले
तिच्या गहाण ठेवलेले शेत
मायबापाच्या जीवाचा घोर
आणि त्यांच्या अफाट कष्टांचे डोंगर थेट

मनी तिच्या घनदाट काळोख झाला
अविचाराने घातला तिच्यावर घाला
काहीही विचार न करता
तिने मृत्यूला लावले गळा

सरकारी नियम बनले फास
तिच्या जीवाचा घेतला घास
झुरळा प्रमाणे जिने तिचे
दाखवून दिले नियतीने आज

मायबापंच्या जीवनी आता
वादळी पाऊस दाटून आला
उठले हे तुफान भयंकर
विझला त्यांच्या नयनाचा तारा

पेपरफुटी नाही ही तर
शिक्षणाची नालस्ती होती
आत्महत्या नव्हे ही तर
हत्याच होती हत्याच होती

**विद्या पवार, विरार**

# निवृत्त सैनिक रमेश खरमाळे यांची सुनंदा जाधव गिरी उर्फ रमा यांनी घेतलेली मुलाखत

**आपल्या बालपणापासून भारतीय सैन्यात दाखल होईपर्यंतचा प्रवास आणि त्या मागची प्रेरणा काय होती?**

माझे बालपण ग्रामीण वातावरणात गेले. लहानपणापासून देशभक्ती, शिस्त, मेहनत आणि समाजसेवेचे संस्कार घरातून मिळाले. भारतीय सैनिकांचे कार्य पाहून देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली आणि त्यातूनच भारतीय सैन्यात दाखल होण्याचा निर्धार केला. देशाची सेवा करण्याची संधी मिळणे, हे माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे भाग्य मानतो.

**भारतीय सैन्यातील १७ वर्षांच्या सेवेत असा कोणता अनुभव आहे, ज्याने तुमच्या व्यक्तिमत्त्वावर कायमचा ठसा उमटवला?**

सैन्याने मला शिस्त, धैर्य, संयम, नेतृत्व आणि संघभावना शिकवली. कठीण परिस्थितीतही शांत राहून योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली. देश प्रथम आणि स्वतः नंतर, हा सैनिकांचा संस्कार आजही माझ्या प्रत्येक कामात दिसून येतो.

**सैन्यातून निवृत्तीनंतर वनविभागात कार्य करण्याचा निर्णय का घेतला? राष्ट्रसेवेतून पर्यावरणसेवेकडे हा प्रवास कसा घडला?**

देशसेवा ही केवळ सीमांवरच होत नाही, तर पर्यावरणाचे संरक्षण करूनही राष्ट्रसेवा करता येते, असा माझा विश्वास आहे. सैन्यातील सेवेनंतर वनविभागात काम करण्याची संधी मिळाली आणि जलसंधारण, वृक्षसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि जनजागृती या माध्यमातून समाजासाठी काम करण्याचा नवा मार्ग मिळाला.

**जलसंधारण, वृक्षसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि ऐतिहासिक वारसा जतन या अनेक क्षेत्रांत काम करताना कोणते संघर्ष आणि कोणते समाधान अनुभवले?**

सुरुवातीला लोकांमध्ये जनजागृती करणे हे मोठे आव्हान होते. अनेकदा संसाधनांची कमतरता आणि प्रतिकूल

## देशसेवेनंतर निसर्ग सेवा हाच माझा वसा.



परिस्थितीचा सामना करावा लागला. मात्र आज अनेक ठिकाणी हरित परिसर, जतन झालेले जलस्रोत आणि वाढलेला लोकसहभाग पाहून समाधान मिळते. लोकांचा बदललेला दृष्टिकोन हीच माझ्या कार्याची खरी कमाई आहे.

**'मन की बात', राष्ट्रपती भवनाचे निमंत्रण, 'Veteran Achiever Award' अशा राष्ट्रीय सन्मानांपैकी कोणता क्षण तुमच्यासाठी सर्वात भावनिक होता आणि का?**

प्रत्येक सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. मात्र राष्ट्रपतींकडून राष्ट्रपती भवनाचे निमंत्रण आणि 'मन की बात' मध्ये कार्याची आणि भारतीय सैन्य दल प्रमुख यांजकडून राष्ट्रपती भवनात सन्मानाची दखल घेतली जाणे हा अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा क्षण होता. कारण हे सन्मान केवळ माझे नसून माझ्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचे आणि समाजाच्या विश्वासाचे प्रतीक आहेत.

**या संपूर्ण प्रवासात आपल्या पत्नी स्वातीताई आणि कुटुंबाचे योगदान किती महत्त्वाचे राहिले?**

माझ्या प्रत्येक यशामागे माझ्या पत्नी स्वाती,मुले आणि संपूर्ण कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्यांनी नेहमी माझ्या कार्याला पाठिंबा दिला, कठीण काळात मानसिक बळ दिले आणि समाजकार्यासाठी वेळ देता यावा म्हणून अनेक जबाबदाऱ्या स्वतः सांभाळल्या. त्यांचे योगदान अमूल्य आहे.



**पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक सामान्य नागरिकाने दररोज कोणत्या तीन गोष्टी आवर्जून करायला हव्यात, असे तुम्हाला वाटते?**

१. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. २. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि जलसंधारणाला हातभार लावावा. ३. प्लास्टिकचा वापर कमी करून परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय लावावी. लहान कृतीतून मोठा बदल घडू शकतो.

**आजच्या तरुणांना देशप्रेम, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधण्यासाठी तुम्ही काय संदेश द्याल?**

देशप्रेम हे केवळ घोषणांमध्ये नसून कृतीत असावे. पर्यावरणाचे संरक्षण, समाजासाठी स्वयंसेवा, कायद्याचा आदर आणि प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडणे हेच खरे राष्ट्रप्रेम आहे. प्रत्येक तरुणाने स्वतःपासून बदलाची सुरुवात केली तर देश अधिक सक्षम आणि समृद्ध बनेल.

**इतके सन्मान मिळाल्यानंतरही तुम्हाला अजून कोणते स्वप्न पूर्ण करायचे आहे किंवा कोणते कार्य अपूर्ण वाटते?**

सन्मान हे अंतिम ध्येय नाहीत, तर पुढे अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा आहेत. पुढील पिढीमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे, अधिकाधिक लोकांना या चळवळीत सहभागी करून घेणे आणि नैसर्गिक व ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात करणे, हेच माझे पुढील स्वप्न आहे.

**'रमेश खरमाळे' या नावामागील माणूस कसा आहे? तुमच्या आयुष्याचे ब्रीदवाक्य एका-दोन वाक्यांत सांगायचे झाले तर ते काय असेल?**

मी स्वतःला एक सामान्य माणूस आणि आयुष्यभर शिकणारा विद्यार्थी समजतो. समाज, राष्ट्र आणि पर्यावरण यांच्यासाठी जे शक्य आहे ते प्रामाणिकपणे करत राहणे, हेच माझे ध्येय आहे.



ब्रीदवाक्य :"राष्ट्रसेवा हीच सर्वोच्च सेवा आणि पर्यावरण संवर्धन हीच भावी पिढीप्रती खरी जबाबदारी."

**अक्षर मानव संघटनेशी आपण जोडले गेला आहात याबाबत आपला अनुभव, मत सांगाल का?**

अक्षर मानव संघटना ही सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने कार्य करणारी प्रेरणादायी संस्था आहे. शिक्षण, पर्यावरण, सामाजिक जाणीव आणि मानवतेची मूल्ये समाजात रुजविण्याचे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. अशा संस्थांना मार्गदर्शन  करण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येकाने अशा उपक्रमांना सहकार्य करावे.





## अक्षर मानव संघटनेतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

आपत्तीच्या काळात योग्य प्रतिसाद देणारे, सजग व प्रशिक्षित नागरिक घडविण्याच्या उद्देशाने अक्षर मानव संघटना यांच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा दि. 17 ऑगस्ट 2026 ते 20 ऑगस्ट 2026 या कालावधीत शेवगाव तालुक्यातील कऱ्हेटाकळी, दहिफळ, खानापूर व घोटाण येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षकांना आपत्तीपूर्व तयारी, आग लागल्यास घ्यावयाची काळजी, भूकंप, पूर, सर्पदंश, प्रथमोपचार (First Aid), आपत्कालीन बचावकार्य तसेच आपत्तीच्या प्रसंगी स्वतःचे व इतरांचे संरक्षण कसे करावे याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येईल.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश शालेय स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, तत्परता व नेतृत्वगुण विकसित करणे तसेच सुरक्षित व सक्षम समाज घडविण्यासाठी प्रशिक्षणाची साखळी निर्माण करणे हा आहे.

**आशिष घाडगे** 86572 76905

# मानसोपचारतज्ज्ञ व अभ्यासकांची परिषद

अक्षर मानव मानसोपचार विभाग आणि मेडिकॅप गिल्ड बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ व १४ डिसेंबर २०२५ रोजी बारामती येथे मानसोपचारतज्ज्ञ व अभ्यासकांची परिषद आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेत प्रामुख्याने महाराष्ट्रातील डॉक्टर, समुपदेशक, समाजकार्य महाविद्यालयीन विद्यार्थी, प्रत्यक्ष समाजकार्य समुपदेशन करणारे अशा विविध क्षेत्रातील मानसोपचाराशी संबंधित तज्ञ उपस्थित होते.



दि. १३ डिसेंबर रोजी डॉ. धामणे यांनी त्यांच्या माऊली प्रतिष्ठान मधील निराधार महिल्यांचा मानसिकतेत त्यांनी केलेल्या भौतिक व मानसिक उपचारामुळे झालेल्या बदलांबद्दल तपशिलवार माहिती सांगितली.

आपल्या समाजातील मानसिक रोगाने ग्रस्त झालेल्या,उपचाराने बऱ्या झालेल्या व्यक्तींना पुन्हा पहिल्यासारखी वागणूक दिली जात नाही. काहींना कुटुंबिय आधार देत नाहीत. अशा निराधार महिला जिथे आसरा मिळेल अशा ठिकाणी राहतात. या असहाय महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. लैंगिक शोषण केले जाते. त्यातून त्यांना गर्भधारणा होते. जन्माला येणाऱ्या मुलांची हेळसांड होते. अशा रस्त्यावर सापडलेल्या महिलांना आधार देऊन त्यांच्या मुलांचे पालकत्व स्वीकारून त्यांचा स्वतःच्या मुलासारखा सांभाळ करण्याचे महान काम डॉ. धामणे दांपत्य व्रतस्थ वृत्तीने करत आहेत.

त्यांचे अनुभव नवीन प्रेरणा देणारेच आहेत.

या निराधार महिलांना योग्यप्रकारे मानसिक आधार देऊन "स्व" अस्तित्वाची जाणीव करून देण्याचे अतिशय जिकिरीचे काम डॉ. धामणे अनेक वर्षांपासून करत आहेत.

येथे जन्माला आलेल्या मुलांमध्ये असणाऱ्या अनुवंशिक मानसिकता ओळखून त्यावर योग्य उपचार करण्यात येतात.

महिलांना स्वावलंबी बनवले जाते. मुलांच्या आरोग्य आणि शिक्षणाची जबाबदारीने काळजी घेतली जाते.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. अर्चना तोंडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व उपस्थित मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांनी आपापले अनुभव सांगितले.

मानसिक आरोग्य आणि समुपदेशन यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

समुपदेशकासाठी आवश्यक असलेले शिक्षण, प्रमाणपत्रं, परवाना,विविध संस्थाची माहिती देण्यात आली. समुपदेशन करतांना घ्यावयाची खबरदारी याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मानसिक आरोग्य बदल असलेले समज- गैरसमज दूर करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यासाठी नियोजन करण्यात आले.

अक्षर मानव संस्थापक राजन खान सरांनी हा उपक्रम नियमितपणे सुरू ठेवण्यासाठी डॉ. अर्चना तोंडे यांना विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यास सांगितले.

**डॉ. यमुना नाखले.**
नागपूर.

# बालपण देगा देवा...

बालपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा हे आपल्या संतानी देवाकडे बालपणीचे मागणे मागितले होते. म्हणजे संतांनाही बालपणाचा मोह सुटला नव्हता तर आपण तर एक सर्वसामान्य माणूस आहोत आपल्यालाही बालपणाचा मोह कसा होणार नाही. मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक टप्पे येतात, पण त्यातला सर्वात सुंदर, निरागस आणि अविस्मरणीय टप्पा म्हणजे बालपण असतो.

बालपणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील त्या वयात मनावर कोणत्याही संस्कारांचे, समाजाच्या बंधनांचे किंवा भेदाभेदांचे ओझे नसते. मूल कोणाशीही तितक्याच आपुलकीने बोलते आणि खेळते. त्या डोळ्यांत ना कोणाबद्दल द्वेष असतो, ना मत्सर. कट्टी झाल्यावर पुन्हा बट्टी करण्यासाठी लागणारा तो पाच मिनिटांचा वेळ म्हणजे जगातील सर्वात मोठे मित्रत्वाचे उदाहरण आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात माणसाला पावलोपावली ताण जाणवतो. पण बालपणीच्या जगात टेन्शन नावाचा शब्दच अस्तित्वात नसतो. उद्या काय होईल? करिअरचं काय? आर्थिक ओढाताण कशी सोसायची? या प्रश्नांऐवजी आज कोणता खेळ खेळायचा ,पावसात कागदाची होडी कधी सोडायची हेच सर्वात मोठे प्रश्न असायचे. मोठेपणी आपण सुखासाठी महागड्या वस्तू आणि सुविधेवर अवलंबून असतो. मात्र बालपणी सुख अगदी स्वस्त आणि सहज उपलब्ध असते. शाळेला मिळालेली सुट्टी.आजीने सांगितलेली परीची गोष्ट. कडक उन्हात खाल्लेला बर्फाचा गोळा.पावसात भिजून मातीत केलेले किल्ले. या छोट्या छोट्या गोष्टींमधून जो परमानंद मिळतो, तो आज करोडो रुपये खर्च करूनही विकत घेता येत नाही. बालपणी आपण निसर्गाच्या खूप जवळ असतो. झाडावर चढणं, फुलपाखरांच्या मागे धावणं, पावसात नाचणं हे सगळं जगणं समृद्ध करत असतं. त्याचबरोबर आजी-आजोबांच्या मांडीवर डोकं ठेवून ऐकलेल्या गोष्टी आयुष्याला लागणारी जीवन भराची शिदोरी देऊन जातात. त्याकाळी मोबाईल नव्हता, पण माणसांची सोबत आणि निखळ प्रेम भरपूर होतं. जसे जसे वय वाढते, तशी जबाबदारीची जाणीव होते आणि माणसातील निरागसपणा कमी होऊ लागतो. आपण व्यवहारी होतो, स्वार्थी होतो आणि स्पर्धेत धावू लागतो. पण जर आपल्याला खऱ्या अर्थाने सुखी व्हायचे असेल, तर आपल्यातील बालपण नेहमी जिवंत ठेवणे गरजेचे आहे. कधीतरी पावसात भिजणे, कधी लहान मुलांसोबत मूल होऊन खेळणे किंवा कधीतरी कामाचा ताण बाजूला सारून स्वतःसाठी वेळ देणे, हेच आपल्याला पुन्हा त्या आनंदाची अनुभूती देऊ शकते.

बालपण हे केवळ वयाचा एक टप्पा नाही, तर तो एक दृष्टिकोन आहे. बालपण परत येत नाही हे जरी सत्य असले, तरी त्या आठवणींच्या पाऊलखुणा जपून ठेवणं आपल्या हातात आहे. म्हणूनच म्हणावसं वाटतं की, ईश्वराने माणसाला दिलेली सर्वात मौल्यवान भेट म्हणजे त्याचे बालपण होय.

**मोहन कळमकर**
मु पोस्ट ढाणकी तालुका उमरखेड जिल्हा यवतमाळ.
मो 7385861446

# दृष्टिक्षेप

## महाराष्ट्रातील विद्यार्थी जपानीत बोलले; जपानी नागरिकांनी केले कौतुक

### अक्षर मानवच्या जपानी भाषा ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण सोहळ्यास आंतराष्ट्रीय स्वरूप

जालना, ता. २८ (वार्ताहर) :

अक्षर मानव परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जपानी भाषा ऑनलाईन शिकवणीवर्गांच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याला आंतराष्ट्रीय स्वरूप लाभले. गुरूवार, दि. २८ मे २०२६ रोजी रात्री ८ वाजता झालेल्या या ऑनलाईन कार्यक्रमात जपानचे नागरिक तागोची सान, संशोधक टायटस पॉडरटनम, ज्येष्ठ साहितयिक राजन खान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अत्यल्प शुल्कात सुरू केलेल्या या जपानी भाषा शिकवणीवर्गात महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी सहभागी होत अशून जपानी भाषा शिकत आहेत. या उपक्रमाची माहिती सोशल मीडियावर वाचल्यानंतर टायटस पॉडरटनम यांनी अक्षर मानवचे संघटक व शिकवणीवर्ग समन्वयक सुजित चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर जपानमधील तागोची सान




ऑनलाईन कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना संशोधक टायटस पॉडरटनम (डावे) आणि जपानचे नागरिक **तागोची सान (उजवे)**.

यांना या प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान तागोची सान यांनी विद्यार्थ्यांशी जपानी भाषेत संवाद साधला.

महाराष्ट्रातील विद्यार्थी जपानी भाषेत सहजणे बोलताना पाहून त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. यशासाठी शिस्त, वेळेचे नियोजन आणि दिलेला शब्द पाळणे या तीन बाबी महत्वाच्या असल्यांचे त्यांनी सांगितले.

सांगितले. हिंदी आणि तेलगू भाषेचाही अध्यास सुरू असल्याने त्यांनी काही वेळे हिंदीतूनही संवाद साधला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ साहितयिक राजन खान यांनी हा उपक्रम अधिक व्याफक स्वरूात राबवून जपानी भाषेच्या विविध स्तरांपर्यत नेण्याची गरज व्यक्त केली.

अक्षर मानवचे राष्ट्रीय अध्यक्ष अजिंक्य किाहीकर यांनी भाषा ही जगाची दारे उघडणारी किल्ली असल्याचे मत व्यक्त केले. राज्य अध्यक्ष अरूण मापारी यांनी भविष्यात जपानीसह विविध देशी व विदेशी भाषांचे वर्ग सुरू करण्याचा मानस व्यक्त

जपानी भाषा शिधिका डॉ. यामुनाताई नाखले यांनी तागोची सान यांच्याशी जपानी भाषेत सविस्तर चर्चा करून भविष्यातील सहकार्याबाबत सकारात्यक संवाद साधला.

या प्रसंगी जपानी भाषा अध्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. डिजिटल प्रमाणपत्रांची निर्मिती रम्मा गिरी यांनी केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रुती सुरेंद्र यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुजित चव्हाण यांनी केले.

लोकमत

## ‘अक्षर मानव’चे केळंबे येथे संमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**लांजा** : अक्षर मानव अभियानाची राज्यस्तरीय बैठक व पदाधिकारी संमेलन तालुक्यातील केळंबे येथे आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक शनिवार, दि. २९ व रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत अमृतसृष्टी कदम फार्म येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजक नितीन कदम यांनी दिली.

प्रख्यात साहित्यिक राजन खान हे अक्षर मानव या अभियानातून महाराष्ट्रभर नव्या विचारांचा प्रकाश पसरवत आहेत. याच उपक्रमाच्या निमित्ताने अक्षर मानवाच्या महाराष्ट्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक व पदाधिकारी संमेलन आयोजित केले आहे.या संमेलनासाठी राज्यभरातील कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. मात्र, शनिवारी दुपारी ४ वाजता खास सत्र लांजातील स्थानिक नागरिकांसाठी ठेवण्यात आलेले आहे. या कार्यक्रमात नागरिकांनी घेण्याचे आवाहन अभियानाचे जिल्हाध्यक्ष युयुत्सू आर्ते व मुख्य संयोजक नितीन कदम यांनी केले आहे.

## चिखलदरा येथे अक्षर मानवतर्फे साहित्य संमेलन

### आठ, नऊ व १० नोव्हेंबरला आयोजन

■ सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. ५ : चिखलदरा येथील दीपशिखा गुरुकुल सैनिक शाळेत अक्षर मानवचे यंदाचे राज्यस्तरीय साहित्य संमेलन आठ, नऊ व १० नोव्हेंबरला होणार आहे.

संमेलनात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. उद्घाटक म्हणून चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक थोरात, स्वागताध्यक्ष म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ. के. एम. कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. केशव तुपे, चिखलदरा नगरपरिषद उपाध्यक्ष

अब्दुल शेख, सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, वर्धा येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, 'चला हवा येऊ द्या फेम' अंकुर वाढवे, किरण काशिनाथ तसेच प्रसिद्ध साहित्यिक, कथा लेखक, कादंबरीकार राजन खान उपस्थित राहणार आहेत.

अक्षर मानव उत्कृष्ट साहित्य पुरस्कार २०२४ चे वितरण या कार्यक्रमात होणार आहे. मराठी मरणार म्हणून गळे काढत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती काय करणार?, साहित्य मनोरंजन, सर्वांनी ऐन वेळी दिलेल्या विषयावर बोलणे व नाटिका, मराठी साहित्यात पर्यावरण, विदर्भातील जंगले आणि सजीव, मराठी वाचवायचे उपाय, मराठी पुस्तकांचा खप व वाचन, बालसाहित्याची दशा, मराठी साहित्य आणि चित्रपट, मराठी पुस्तकांचा व्यवसाय, हे या संमेलनाचे विषय असणार आहेत. तीन दिवस होणाऱ्या या अक्षर मानव साहित्य संमेलनास उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षर मानवचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्रीकांत डांगे, राष्ट्रीय अध्यक्ष अजिंक्य किन्हीकर, राज्य अध्यक्ष डॉ. प्रा. प्रवीण जावळे, अक्षर मानव अमरावतीचे जिल्हाध्यक्ष आझाद खान, साहित्य प्रमुख संजीवनी राजगुरू, संघटक जावेदा जिंदगी, लेखक सुदाम सोनुले आदींनी केले आहे.

महेश जगताप
लोकमत न्यूज नेटवर्क
लोकमत

मस्ट READ

# 'विचारांना पुढे न्यायचे काम आवश्यक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोमेश्वरनगर** : ज्ञानोबा-तुकोबांपासून गाडगेबाबा-तुकडोजींपर्यंत आपल्याला संत साहित्याचा आणि शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा एक समृद्ध वारसा आहे. साहित्य संमेलनातून त्या सगळ्यांच्या मानवतेच्या विचारांना पुढे न्यायचे काम आवश्यक आहे. संतविचार आणि पुरोगामी विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी शिक्षक आणि साहित्यिकांचीच आहे, असे मत प्रसिद्ध कवी हनुमंत चांदगुडे यांनी व्यक्त केले.

अक्षरमानव संघटनेच्या वतीने मुर्टी-मोढवे (ता. बारामती) येथील यशवंतराव मोरे पाटील आश्रमशाळेत रविवारी एकदिवसीय 'अक्षरमानव साहित्य संमेलन' पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षपदावरून चांदगुडे यांनी सहभागींचे मार्गदर्शन केले. संमेलनात विविध सत्रे पार पडली. समारोपाचे पाहुणे आणि मराठी समीक्षक डॉ. प्रवीण ताटे देशमुख म्हणाले, एकीकडे धोरणांच्या नावाखाली शिक्षणव्यवस्था मोडकळीस आणली जात आहे आणि सोबत सुमारांची सद्दी जाणीवपूर्वक वाढविली जात आहे.

यशवंतराव मोरे पाटील आश्रमशाळेत रविवारी एकदिवसीय 'अक्षरमानव साहित्य संमेलन'



मुर्टी-मोढवे (ता. बारामती) येथे अक्षरमानव साहित्य संमेलन पार पडले.

## वारसा घेऊन ताकदीने पुढे आले पाहिजे

अशावेळी साहित्यिक आणि चळवळीतील कार्यकर्त्यांनी आपला खरा सांस्कृतिक वारसा घेऊन ताकदीने पुढे आले पाहिजे. संमेलनात बारामती तालुक्यातील कवी आणि कथाकारांचे कविसंमेलन तसेच कथाकथनाची मैफल रंगली. प्रा. रवींद्र कोकरे, ज. तु. गार्डे, राजनंदिनी पडळ यांनी विनोदी व प्रबोधनात्मक कथा सादर केल्या. प्रसिद्ध कवी हनुमंत चांदगुडे, डॉ. किरण गाढवे, अलका रसाळ, संगीता देशमुख, वनिता जाधव, सुजाता शिंदे, गुंडराव शिंदे, प्रशांत लडकत, प्रमोद जगताप, उमाकांत भेस्के, जगदीश पिंगळे, सोमनाथ सुतार यांनी कविता सादर केल्या. स्वागताध्यक्ष ॲड. आकाश मोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राजेंद्र बालगुडे यांनी केले.

सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews

# अक्षर मानव संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**सातारा न्यूज;**
**कराड** : अक्षर मानव संघटना महाराष्ट्र राज्य आणि राज्य परिवहन विभाग, शाखा कराड यांच्या संयुक्त विद्यमाने कराड बस स्थानकात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरासाठी महालक्ष्मी रक्तपेढीचे मोलाचे सहकार्य मिळाले. यावेळी राज्य परिवहन विभागाचे कराड शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते. अक्षर मानव संघटनेचे राज्य संघटक व सातारा जिल्हा पालकमंत्री मा. सुजित चव्हाण हे देखील उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी अक्षर मानव संघटनेकडून ५० वाचनीय पुस्तकं सवलतीच्या दरात आयोजकांना देण्यात आली, ती पुस्तकं रक्तदात्यांना भेट म्हणून देण्यात आली. ही पुस्तकं अक्षर मानवची भूमिका समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त असून, वाचकाला जगण्याची नवी दिशा देणारी, मन, मेंदू, माणूस, कुटुंब आणि मानवी समाज शांत, सुखी करण्यासाठी वाचनीय आहेत. ज्यांना ही पुस्तक आपल्या उपक्रमांमध्ये मागवायची आहेत त्यांनी सुजित चव्हाण (अक्षर मानव संघटक, महाराष्ट्र राज्य) यांना ९५२७२१२२३३ या नंबरवर वॉट्सअप संपर्क करून मागवावीत. पोस्टल खर्च अक्षर मानवकडून करण्यात येतो.

या शिबिरासाठी अक्षर मानवकडून सातारा जिल्हा कार्यकारिणीच्या कार्यवाह ॲड. वैशाली सोनावले यांनी खूप कष्ट घेतले आणि आयोजकाची भूमिका यशस्वीपणे पार पाडली. यावेळी अक्षर मानवच्या सातारा जिल्हा कार्यकरिणीतील कार्यवाह पत्रकार विजया माने देखील उपस्थित होत्या. भेट दिलेले पाहुणे कराड बार असोसिएशनचे अध्यक्ष दिपक थोरात, सहसचिव मिसार शेख, ॲड. शेजवळ सर तसेच रा.प. मंडळाचे कर्मचारी महेश पाटोळेयांनी सदिच्छा भेट दिली तर ह्यूमन राईट्स चे कार्यकर्ते किशोर जाधव सर यांनी भेट देवून रक्तदानाचे कर्तव्य ही बजावले.

Aug 17, 2025 Page 2 | esataranews.com
Powered By : Thoughtpad Infotech | 9763626288

सत्य - निर्भीड - निष्पक्ष
लोकशक्ती न्यूज २४
मुख्यसंपादक - प्रा. विजय लेंडाळ संपादक - रावसाहेब निकाळजे कार्यकारी संपादक - इम्रान शेख
२९ एप्रिल २०२५, पुणे

# अक्षर मानव महिला संमेलन राळेगणसिद्धी येथे मोठ्या उत्साहात संपन्न

लोकशक्ती न्यूज नेटवर्क
**पुणे प्रतिनिधी / शकील मनियार**

अक्षर मानव महिला संमेलन दिनांक २५, २६, २७ एप्रिल तीन दिवस राळेगण सिद्धी येथे मोठ्या उत्साहात संप्पन झाले. राही फौंडेशनच्या डॉ सुनीता पोटे व डॉ संतोष पोटे व संपूर्ण अक्षर मानव आजीवन सदस्य यांनी अतिशय सूत्रबद्ध आयोजन केले. महाराष्टातून अनेक महिला संघटन करणाऱ्या सामाजिक क्षेत्रातून विचारवंत महिलांनी सहभाग घेतला. ३ दिवस महिलांनी माहेरपण उपभोगल्याचा आनंद घेतला विशेष म्हणजे हे संमेलन निशुल्क होते. भारताचे संविधान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात करत महिलांच्या अनेक गंभीर विषयांना या संमेलनात मांडले गेले व त्यावरील उपाय योजना यांचा उहापोह करण्यात आला.

अक्षर मानव संघटनेची संकल्पना ज्यांच्या विचार धारेतून उदयास आली, असे प्रसिद्ध लेखक राजन खान यांनी महिलांना रूढी परपंरा यातून बाहेर पडा व तुमचे स्त्री असणे हे खूप सुंदर आहे व तिचे माणुसपण होणे महत्वाचे आहे. तिच्यातील निखळ माणूस होऊन जगणे फार सुंदर आहे ते छान जगा असा सल्ला दिला. मातृत्व व वंशाचा दिवा यावर डॉ सुनिताताई पोटे यांनी महिलांना खूप छान मार्गदर्शन केले. तसेच संगीताताई नरके यांनी स्त्रियांवरील खरे गंभीर वास्तव याची खूप सुरेख मांडणी केली. हर्षदाताई पिलाने, स्वाती ताई मापारी व अरुणभाऊ मापारी यांनी स्त्रियांची फसवणूकीचे ठिकाणे कोणती आहेत व त्यावरील उपाय यावर सर्व महिलांशी संवाद साधले. स्त्री चे व्यक्ती स्वातंत्र्य, लैंगिक शोषण, महिलांचे आर्थिक स्वावलंबन या विषयांना हात घालून त्यावर चर्चा सत्रे करण्यात आली. या संमेलनात पुढील ८ कर्तबगार महिलांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन तसेच भारताचे संविधान देऊन सन्मानित करण्यात आले.



## निवडपत्र संदर्भ

दुर्गा देशमाने, माजलगाव संविधान प्रचार व प्रसार. सुमन साळवे, शिरुर मजूरांच्या मुलांचे शिक्षण व बहुविध समाजकार्य. ज्योती धंदर, बुलढाणा प्रामाणिक पोलीस अधिकारी व महिला सबलीकरण. प्रतिभा इराकशेट्टी, माळ मुरबाड मतिमंद मुलांची निवासी शाळा. मीरा चंद्रकला विठ्ठल सपकाळे, कल्याण महामाया असंघटित व घरकामगार संघटना - संस्थापक अध्यक्ष. शर्वरी सुरेखा अरुण समाजबंध संस्था, 'प- पाळीचा' द्वारे मुली महिलांमध्ये जागृती. प्रज्ञा काटे,बारामती बाल लैंगिक समस्या. वृषाली माने, मुलुंड संविधान लोकजागर परिषद. राज्य भरातून अनेक विचारवंत लेखक, कवायत्री, वकील, पोलीस, डॉक्टर, काउन्सलर, समाजसेविका, गृहिणी अशा विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बाजावलेल्या महिला राज्यभरातून उपस्थित होत्या. तसेच अक्षर मानवचे. डॉ संतोष पोटे, सुजित, श्रीकांत डांगे, अजिंक्य किन्हीकर प्रवीण जावळे, जावेदा, डॉ बेंद्रे रश्मी ताई या सर्वांनी संपूर्ण महिला संमेलनास उस्फुर्त सहकार्य केले. समाजसेवक अण्णा हजारें यांनीही महिलांशी मुक्तपणे संवाद साधला व मार्गदर्शन केले. असे हे अतिशय यशस्वी, सुंदर, सुसूत्र आनंदमयी वातावरणात तीन दिवस राज्य भरातून महिलांनी सहभाग घेऊन अक्षर मानव महिला संमेलन संपन्न झाले. माणसाने माणूस मारला या सुंदर कवितेने संमेलनाचा समारोप झाला.

# अक्षर मानव द्वारा 'छात्र संवाद' का सफल आयोजन



अमरावती. प्रभावी संचार एक सफल शैक्षणिक वातावरण की नींव है. १६ सितंबर को ओज़ोन जागरूकता दिवस के अवसर पर अक्षर मानव अमरावती एवं वर्धा जिला कार्यकारिणी द्वारा श्री सोमनाथ विद्यामंदिर, उमरी, ता.कारंजा (घाडगे) जिला वर्धा में 'छात्र संवाद' (युवा संवाद) कार्यक्रम का आयोजन किया गया. इसके साथ ही इस विद्यालय का ४३वाँ वार्षिकोत्सव भी मनाया गया.कार्यक्रम की अध्यक्षता श्री सतीकृपा शिक्षण संस्था वर्धा के निदेशक माननीय श्री अरुणराव ढोले सर ने की. अक्षर मानव संस्था के महाराष्ट्र राज्य संगठक एवं विदर्भ के पालकमंत्री आज़ाद जमा खान मुख्य अतिथि के रूप में उपस्थित थे. स्कूली विद्यार्थियों के बीच खुले संवाद को सुगम बनाने के लिए, अक्षर मानव अमरावती जिला सचिव श्रीमती अश्विनीताई विटोंडे-खान और आर्वी की सुप्रसिद्ध महिला परामर्शदाता और कवयित्री, लेखिका प्रांजलि ताई आत्राम कार्यक्रम में विशेष रूप से उपस्थित थीं. अक्षर मानव संगठन राज्य भर में साहित्य, समाज, कला, शिक्षा, पर्यावरण, उद्योग, श्रम, विज्ञान जैसे मानव जीवन के सौ से अधिक विषयों पर काम करता है. राज्य संगठक श्री आज़ाद खान ने जानकारी दी कि यह सभी मतभेदों से परे जाकर परिवार और सामाजिक व्यवस्था की भलाई के लिए काम करता है. अगर हमें जीवन में आगे बढ़ना है, तो हमें स्कूल में अपने शिक्षकों की बात माननी चाहिए जैसे हम घर पर अपने माता-पिता की सुनते हैं. अगर हमें आसमान में ऊंची उड़ान भरनी है, तो बच्चों को शिक्षकों के आदर्श छात्र बनना चाहिए, ऐसा श्री आज़ाद खान ने उपस्थित विद्यार्थियों को बहुमूल्य मार्गदर्शन देते हुए कहा. स्कूल में छात्राओं को बौद्धिक, मानसिक और शैक्षणिक समस्याओं के बारे में मार्गदर्शन देते हुए, अगर आपके कोई प्रश्न हैं, तो पहले अपने माता-पिता के साथ खुलकर संवाद करें. अगर आपको संवाद करते समय कोई कठिनाई आती है, तो मुझसे एक बड़ी बहन या दोस्त के रूप में बात करें. प्रांजलि ताई आत्राम ने छात्राओं को बहुमूल्य मार्गदर्शन दिया. अक्षर मानव अमरावती जिला सचिव अश्विनी विटोंडे-खान ने कहा कि १०वीं और १२वीं की उम्र सही लक्ष्य निर्धारित करने की होती है. आपको अपना लक्ष्य निर्धारित करना चाहिए और कड़ी मेहनत करनी चाहिए. किसी भी काम को करते समय हीन भावना न रखें, कोई भी काम छोटा या बड़ा नहीं होता, उन्होंने बहुमूल्य मार्गदर्शन दिया. अपने अध्यक्षीय भाषण में ढोले सर ने कहा कि अक्षर मानव संगठन वह काम कर रहा है जो राजनेताओं को करना चाहिए. 'एक सच्चे इंसान की तरह जियो' का संदेश बहुत बड़ा संदेश है. मैं इस विचार की सराहना करती हूँ. अक्षर मानव जैसे संगठन समाज में होने चाहिए. हमारा स्कूल हमेशा आपकी पहल के लिए उपलब्ध है. ' उन्होंने स्कूल में बच्चों को बहुमूल्य मार्गदर्शन दिया. छात्र संवाद, ओजोन दिवस, वर्षगांठ, ओजोन जागरूकता, ओजोन जागरूकता के अवसर पर भाषण प्रतियोगिता का आयोजन किया गया, सभी मुख्य अतिथियों द्वारा पुरस्कार वितरण किया गया.

### ओज़ोन जागरूकता दिवस पर छात्रों को पुरस्कार वितरित

प्रथम स्थान सुश्री अक्षरा चोपड़े और नीलम मोरेश्वर गोहटे, द्वितीय स्थान - सुश्री पल्लवी कामतकर. भक्ति गीत गायन में प्रथम स्थान सुश्री श्रावणी घागरे, द्वितीय स्थान चौ. मयूर मेंढे को बच्चों को वितरित किया गया. प्रवेश विद्यालय के प्राचार्य श्री राजकुमार शंकरराव तिरभणे ने दिया और कार्यक्रम का संचालन सुश्री नीलम मोरेश्वर और सुश्री प्रतीक्षा कालभुत ने किया जबकि आभार प्रदर्शन वैशाली ठाकरे-ढोले ने किया. प्राचार्य राजकुमार तिरभणे, मनीषा कामठे, निकिता गोरे, रामेश्वर डोंगरे, ईश्वर हिंगवे, युवराज किंकर, वैशाली ठाकरे आदि ने कार्यक्रम को सफल बनाने में कड़ी मेहनत की.

# अक्षर मानव संघटना व स्वरसंगम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कवी संमेलनाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी**

दि. २२ नोव्हेंबर , २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता विरंगुळा केंद्र मिरारोड, मुंबई येथे अक्षर मानव संघटना व स्वरसंगम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवी संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनाला अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध गझलकार सुनंदा पाटील या लाभल्या होत्या. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून विनया म्हात्रे उपस्थित होत्या. अक्षर मानव अंतराष्ट्रीय अध्यक्ष श्रीयुत श्रीकांत डांगे तसेच अक्षर मानव कविता विभाग प्रमुख मुंबई कल्पना म्हापुस्कर कार्यक्रमात उपस्थित होते. स्वरसंगम फाऊंडेशनचे सर्वेसर्वा हृदयेशमयंक दूबे हे देखील कार्यक्रमाला उपस्थित होते. या कवी संमेलनात २५ हून अधिक कवींनी आपल्या कविता सादर केल्या. मुंबई आणि उपनगरातील कवी आणि कवियत्री या कवी संमेलनात सहभागी होतेच शिवाय बोईसर, कामोठे, ठाणे, पालघर, पनवेल येथून आलेले कवी आणि कवयित्री कविसंमेलनात सहभागी झाले होते.



कविसंमेलनात विविध आशयावरच्या दर्जेदार कविता सादर केल्या गेल्या. त्याला रसीक श्रोत्यांची खूप वाहवा मिळाली. मोठ्या संख्येने श्रोते या कार्यक्रमात उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात सुनंदा पाटील यांनी कविता कशी असावी, कशी सादर करावी याचे निकष उपस्थित श्रोत्यांना समजावून सांगितले. अक्षर मानव अंतराष्ट्रीय अध्यक्ष श्रीयुत श्रीकांत डांगे यांनी अक्षर मानवची भूमिका श्रोत्यांसमोर मांडून जास्तीत जास्त लोक हे अक्षर मानवशी जोडले जावे याचे आवाहन केले. स्वरसंगम फाऊंडेशनचे हृदयेश मयंक दुबे यांनी विरंगुळा केंद्रावर असे कार्यक्रम नेहमी झाले पाहिजेत याचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी अक्षर मानव मुंबई पश्चिम जिल्हाध्यक्ष श्रीमती कल्पना उबाळे तसेच अक्षर मानव' मुंबई पश्चिम उपाध्यक्ष श्रीमती रमा गिरी यांनी संभाळली. अशा या दिमाखदार सोहळ्याची सांगता अक्षर मानव कविता विभाग प्रमुख श्रीमती. कल्पना म्हापुस्कर यांच्या आभार प्रदर्शनाने तसेच राष्ट्रगीताने झाली.

कवी संमेलन देखणे पार पाडल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, लेखक व मार्गदर्शक मा. राजन खान तसेच अक्षर मानव संघटनेच्या राज्य कार्यकारिणीतील अध्यक्ष प्रवीण जावळे, उपाध्यक्ष दीपेश मोहिते, कार्याध्यक्ष नीलिमा शिकारखाने, सचिव अरुण मापारी, संचालिका संजीवनी राजगुरू आणि संघटक सुजित चव्हाण यांनी आयोजकांचे व सहभागी कवींचे कौतुक केले.

**लोकमत**

# अक्षर मानव मानसोपचारतज्ज्ञ दोन दिवशीय परिषद बारामतीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** मेडिकोज गिल्ड, बारामतीच्या वतीने अक्षर मानव मानसोपचारतज्ज्ञ परिषदेचे बारामती येथे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद १३ आणि १४ डिसेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती अक्षर मानव महाराष्ट्र संचालक झरिना खान यांनी दिली.

जगाचा आणि जगण्याचा बदललेला ढाचा माणसाला अस्वस्थ करतो, घाबरवतो आणि त्याचा मनावर परिणाम होतो. त्यामुळे माणसाचं मानसिक स्वास्थ्य हरवते, ज्याचा वाईट परिणाम त्याच्या शारीरिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्वास्थ्यावर होतो. मानसोपचाराची गरज असलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या मुद्द्याला उद्धृत करत, मानसोपचारतज्ज्ञांनी आपापसांत एक व्यापक चर्चा व्हायला हवी. मानसोपचारतज्ज्ञ एकमेकांना भेटून आपापल्या अडचणी, समस्या, प्रश्न आणि उत्तरांवर चर्चा करावी, तसेच पुढील दिशा ठरवायला हवी. यासाठी अक्षर मानव मानसोपचारतज्ज्ञ परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

**अक्षर मानव महाराष्ट्र मानसोपचार ही आता माणसांची नेहमीची गरज बनली आहे**

व्यवसाय करत असाल किंवा तज्ज्ञ असाल, तर आपल्यासाठी हे निमंत्रण आहे. आपले विचार, मते आणि मार्ग मांडावेत, असे संयोजकांनी आवाहन केले आहे. सहभागी होण्याची कोणतीही फी नाही. बाहेरून येणाऱ्यांसाठी राहण्याजेवणाचे विनामूल्य आयोजन केले आहे. नोंदणी आवश्यक असल्याचे संचालक झरिना खान यांनी सांगितले.

**कार्यारंभ**

Wed 23 Apr 2025

# दुर्गा देशमाने यांना अक्षर मानव कर्तबगार महिला पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । माजलगाव**

दि.२२ : माझं संविधान माझी जबाबदारी या अभियाना अंतर्गत संविधान दूत म्हणून संविधान जागराचे कार्य त्या अगदी मनापासून आनंदाने पार पाडत आहेत. संक्रात स्पेशल हळदी कुंकू समारंभामध्ये, शाळेमध्ये, मंदिरामध्ये, कराटे क्लास मध्ये, एखाद्या दुकानांमध्ये जिथे काही महिलांचा किंवा लोकांचा समूह असेल त्या ठिकाणी त्यांचे संविधान जागराचे काम चालू असते. अर्थातच यामागची प्रेरणा म्हणजे फुले प्रेमी संविधान दूत, आणि या वर्षी सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त ३ ते जानेवारीला पुण्यामध्ये आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल या चार दिवसीय संमेलनाचे आयोजन करणारे भिडेवाडाकार विजय वडवेराव आहेत. ज्यांनी गोडांबेवाडी ता.मुळशी जि.पुणे हे गाव घरोघरी संविधान देऊन



आतापर्यंत अनेक शाळांना व फेस्टिव्हलमध्ये सहभागी झालेल्या सर्व कवी कवयित्रींना जवळजवळ ६०० प्रति संविधान भेट दिलेले आहे. राळेगण सिद्धी ता.पारनेर जि.अहिल्यानगर येथे होणाऱ्या अक्षर मानव संघटनेच्या भव्य महिला संमेलनात, दि.२७ एप्रिल रोजी कर्तुत्ववान महिला पुरस्काराने, फुलेप्रेमी संविधान दूत, दुर्गा देशमाने राऊत यांना संमेलाध्यक्ष संगीता हरी नरके व अक्षर मानव संस्थापक प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत राजन खान गुरुजी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. माजलगावकरांसाठी ही मोठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. सर्व स्तरातून दुर्गा देशमाने

https://karyarambh.com/news




व्यंगचित्र: विद्या पवार

## आगामी उपक्रम :

### 1) अक्षर मानव माणूस संमेलन, सतरा

21, 22, 23 ऑगस्ट 2026

**ठिकाण** : सीताखांडी वाकद, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**विषय : बदलते स्त्री पुरुष संबंध :** अर्थात आपली बदलती घरं आणि आपला बदलता समाज : काल, आज आणि उद्या
रम्य टेकड्यांचा परिसर, झाडीझाडोरा, एक महाराष्ट्रात जाते आणि दुसरी तेलंगणात जाते अशा दोन नद्यांचा उगम एकाच ठिकाणी, हिरवाई, सुंदर तलाव आणि राहण्यासाठी छोटी छोटी घरं, सोबत पशुपक्ष्यांची संगत, रिमझिम पाऊस, उबीला शेकोटी, गावरान चवीचे जेवण आणि चांगल्या माणसांचा सहवास.
तीन दिवस रमायला, बोलायला, ऐकायला जरुर या.

**प्रवेशमूल्य :**

Earlybirds: 18 ऑगस्ट 2026 पर्यंत एक हजार रुपये. (यात राहणे, जेवणे, नाश्ता यांचा समावेश.)

Late comers: 20 ऑगस्ट 2026 पर्यंत दीड हजार रुपये.

प्रत्यक्ष संमेलनस्थळी (Spot Registration) दोन हजार रुपये.

नावनोंदणी संपर्क : 9552907898 (फक्त वॉट्सअप मेसेज करावा. फोन नको.)

***

अक्षर मानव' संघटनेकडून दर वर्षी माणसांचं एक संमेलन भरवलं जातं. दर वर्षीच्या संमेलनाला एक विषय किंवा एक नाव दिलं जातं. किंवा असं म्हणूया की, माणसाच्या जगण्यातली एक संकल्पना दिली जाते, आणि त्या संकल्पनेच्या भोवती तीन दिवस गप्पा मारत, चर्चा करत, त्या संकल्पनेचा आनंददायी आणि तेवढाच गंभीर, जगण्याला उपयुक्त उलगडा करत हे संमेलन चालतं. संमेलनाचा मुख्य उद्देश आहे, माणसाला माणूस जोडणं. त्यामुळं कसला भेदाभेद न करता, सर्व क्षेत्रांतली, सर्व भागांमधली, सर्व गटातटांची माणसं इथं येतात. या संमेलनात सहभागी होणारी सर्वच्या सर्व माणसं एकत्र राहतात आणि एकमेकांशी सतत बोलत एकमेकांना जाणून घेत असतात. या संमेलनाचा कसलाही गाजावाजा केला जात नाही, पण हस्ते-परहस्ते महाराष्ट्रभर निरोप दिले जातात व माणसं जमतात. संमेलनाचं कुणालाही कसलंही निमंत्रण दिलं जात नाही. मानापानाच्या कसल्याही कल्पना राबवल्या जात नाहीत. सगळी माणसं समान आहेत आणि माणसं माणसाकडं जातातच या विश्वासावर माणसं जमतात. प्रत्यक्ष संमेलनातही फारशा औपचारिकता नसतात. उद्घाटन, अध्यक्ष, दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन, हारतुरे काही नसतात. जमलेल्या सर्व लोकांमधून, ऐन वेळी - कसलीही नियोजित कार्यक्रमपत्रिका तयार न करता - एका व्यक्तीला बोलावलं जातं आणि एका खुर्चीत बसवून, तिला हव्या त्या विचारावर बोलू दिलं जातं. त्या व्यक्तीशी समोर बसलेले लोक मुक्तपणे संवाद करतात आणि असं सलग तीन दिवस चालतं. माणसांनी एकमेकांना आस्थेनं समजून घेण्यासाठी, माणूस घडवण्यासाठी आणि माणसांमध्ये सर्व मतांच्या, भेदांच्या पल्याड जाऊन आत्मीयता निर्माण होण्यासाठी हे संमेलन आहे. दर वर्षी मानवी आयुष्यातला एक महत्वाचा विषय घेऊन त्यावर हे संमेलन होतं. या वर्षीचा विषय आहे, बदलते स्त्री पुरुष संबंध : काल, आज आणि उद्या
विविध स्तरांतली, क्षेत्रांतली, अनुभवांतली माणसं येतील संमेलनात. ती स्वतःचं जगणं मांडतील. सुखदुःखाची बोलणी करतील. सगळे जण एकमेकांपासून जगण्याचा बोध घेतील.

संमेलनात सहभागी होणाऱ्या सगळ्यांना बोलावं मात्र लागतं. वर्षभर आपण सगळे राबत असतो. निरनिराळ्या उपद्व्यापात अडकलेले असतो. अपेक्षित असं असतं की, वर्षाच्या तीनशे पासष्ट दिवसांपैकी काही दिवस या संमेलनाच्या निमित्तानं माणसांनी सुट्टीचे म्हणून आणि सर्वांबरोबर आनंदानं एकत्र राहण्याचे म्हणून वेगळे काढावेत आणि निवांत आपल्या माहेरी राहायला यावं. संमेलन तीन दिवसांचं होतं. त्यात सर्व जण एकत्र राहतात. हे एकत्र राहणं म्हणजेच संमेलन. काही वर्षं पाचगणीला हे संमेलन झालं, एके वर्षी पुण्याजवळच्या भोरगिरीला झालं, एके वर्षी हे संमेलन गौताळ्याला झालं, मग रतनगडला झालं, मग जुन्नरला झालं. मग भोर इथं झालं. मग माणगावला झालं. रम्य ठिकाण, रम्य पाऊस, रम्य माणसं. उत्तम जेवण, चहा-नाश्ता. लागलंसवरलं तर देखभाल करायला माणसंही असतात. सोबतीला निकोप, निरोगी पाऊसही असतो. महिलांची राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली जाते. या संमेलनात दारूला बंदी असते. या संमेलनामुळं मानवी सामाजिक संस्कार घडतात, हा विश्वास आहे आणि तो अनुभव गेली काही वर्षं येतो आहे. इथली मतमतांतरं सर्वदूर पोहोचतात आणि पुढच्या काळात ती सर्वत्र नांदत, निनादत असतात. आयुष्याच्या खूप महत्वाच्या आणि दिशादर्शक गोष्टी या संमेलनामध्ये बोलल्या-ऐकल्या जातात. त्या अर्थानं ही संमेलनं खूप अर्थपूर्ण आणि खोल चिंतन-मननाची होतात. या वर्षीच्या संमेलनासाठी आपण यावं म्हणून हे खुलं निमंत्रण. हे संमेलन ऐकायला कितीही जण येऊ शकतात, कुणाला त्यासाठी बंदी नाही, पण मुक्कामी राहण्याच्या जागेची मात्र मर्यादा आहे. तिथं शंभर-सव्वाशे माणसांचीच रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था करता येते, त्यामुळं संमेलनाला येणारांनी आगाऊच आपलं नाव कळवावं, अशी अपेक्षा असते आणि एकदा नाव कळवल्यावर काहीही झालं तरी रद्द करू नये अशी अपेक्षा असते. कारण आधी नाव नोंदवल्यानंतर, नंतर येणाऱ्या माणसांना नकार कळवला जातो, त्यामुळं आधी नाव नोंदवून नंतर गैरहजर राहणारांमुळं नंतर येऊ पाहणारांवर अन्याय होतो. येण्याआधी नावनोंदणी करून येतोय म्हणून कळवावं लागतं.

## 2) अक्षर मानव झाड संमेलन व भव्य वृक्षारोपण मोहीम

स्नेही नागरिक, पर्यावरणप्रेमी व ग्रामस्थ बंधू-भगिनींनो,

पर्यावरणाचा समतोल राखणे आणि येणाऱ्या पिढीला हिरवीगार वसुंधरा भेट देणे ही आजच्या काळाची गरज आहे. याच उदात्त ध्येयाने नाईकनगर (ता. देगलूर, जि. नांदेड) येथे 'अक्षर मानव झाड संमेलन' आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनाचे मुख्य उद्दिष्ट केवळ विचारांची देवाणघेवाण करणे एवढेच नसून प्रत्यक्षात ५०० झाडांचे रोपण करून त्यांचे संगोपन करणे हे आहे. साहित्य, विचार आणि पर्यावरण यांचा सुंदर संगम या दोन दिवशी आपल्याला पाहायला मिळेल.

या हरितोत्सवात आपण सर्वांनी कुटुंब आणि मित्रांसह सहभागी होऊन या वृक्षारोपण मोहिमेला यशस्वी करावे, ही नम्र विनंती!

- **दिनांक**: २४ आणि २५ ऑगस्ट २०२६
- **स्थान**: नाईकनगर, ता. देगलूर, जि. नांदेड

**संमेलन वेळापत्रक**

दिवस १: सोमवार, २४ ऑगस्ट २०२६

- दुपारी ०३:०० ते ०४:००: नोंदणी आणि अल्पोपहार
- संध्याकाळी ०४:०० ते ०७:००: 'अक्षर मानव झाड संमेलन' उद्घाटन सोहळा
- प्रमुख पाहुणे : न्यायाधीश, इंजिनिअर, वकील, सरपंच
    - भव्य वृक्षारोपण मोहीम (सत्र १)
    - ५०० झाडांच्या रोपणाचा प्रारंभ (नाईकनगर परिसर)

◦ रात्री ०८ ते ०९ : जेवण

◦ रात्री ०९:०० ते १०:००:गप्पा:"पर्यावरण आणि आपली जबाबदारी"

• रात्री १०:०० ते ११:००:'झाड आणि माणूस' - निसर्गकवींचे संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम / भजनाचा कार्यक्रम

दिवस २: मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६

• सकाळी ०७:३० ते ०९:३०: चहा,नाश्ता

• सकाळी ०९:३० ते ०१:३० वृक्षारोपण मोहीम (सत्र २) व झाडांचे दत्तक विधान

◦ उर्वरित रोपांची लागवड व ग्रामस्थांकडे संगोपनाची जबाबदारी सुपूर्द करणे

• दुपारी ०१:३० ते ०२:३०: भोजन सुट्टी

• दुपारी ०२:३० ते ०३:००:समारोप सोहळा व सत्कार

◦ सहभागी पर्यावरणप्रेमींचा सन्मान

◦ संमेलनाचे फलित आणि भविष्यातील संकल्प

१. वृक्षारोपणासाठी येताना शक्य असल्यास स्वतःची रोपे सोबत आणावीत.

२. सर्वांसाठी भोजनाची व राहण्याची उत्तम सोय करण्यात आली आहे.

आपले नम्र,

आयोजक,

अक्षर मानव झाड संमेलन समिती

गोपाल नाईक, निमंत्रक, +91 94221 85112

संजीवनी राजगुरू, अक्षर मानव झाड लावणारी फौज, +91 88501 80935

संजय सपकाळ, अध्यक्ष, अक्षर मानव चित्रपट निर्मिती मंडळ, +91 82650 40253

नाईकनगर, ता. देगलूर, जि. नांदेड

## अक्षर मानव आजीव सदस्य अभियान

अक्षर मानव मानवी जगण्याच्या नव्वद क्षेत्रांत काम करतं. माणसांची एकमेकांना मदत करणारी साखळी तयार करणं आणि व्यक्ती, कुटुंब, गाव व प्रत्येक कार्यक्षेत्र विकसित करणारे उपक्रम घेणं, हे अक्षर मानवचं काम आहे.

अक्षर मानवचे आजीव सदस्य व्हा. अक्षर मानव आजीव सदस्य फी पाचशे रुपये.

Name :-AKSHAR MANAV

Bank : janata sahakari

Acc no :- 070230100000721

Branch :- NARHE AMBEGAON

IFSC CODE :- JSBP0000070

फोन पे 9552907898

फी भरल्याचं 9552907898 या क्रमांकावर कळवा. सोबत आपलं नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबर, इमेल आयडी कळवा. पावती पाठवली जाईल.

# सामील व्हा!

अक्षर मानव – माणसाला माणूस जोडण्याचा संकल्प! तुम्ही तयार आहात का?

माणुसकीला नवं स्वरूप देण्यासाठी, समाजातले भेद मिटवण्यासाठी, आणि एक आनंदी, सुखी, समताधिष्ठित विश्व निर्माण करण्यासाठी अक्षर मानव तुम्हाला साद घालत आहे! आम्ही फक्त स्वप्नं पाहत नाही, तर ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कृती करतो. तुम्हीही या प्रवासात आमच्यासोबत सामील व्हा!

अक्षर मानव म्हणजे काय?माणुसकीचा जागर: जाती, धर्म, लिंग, वर्ग यांच्या पलीकडे जाऊन माणसाला माणसाशी जोडणारी एक चळवळ.

बौद्धिक प्रेरणा: माणसाच्या बुद्धीचा विकास, विचारशक्तीला चालना, आणि सकारात्मक बदलासाठी कला, साहित्य, आणि संस्कृतीचा वापर.

सर्वसमावेशक व्यासपीठ: कोणत्याही वयाचा, कोणत्याही क्षेत्रातला, कोणत्याही गावातला माणूस आमच्यासोबत येऊ शकतो.

सामाजिक बदल: दंगली, भांडणं, युद्धं संपवून शांतता आणि समता निर्माण करण्याचा संकल्प.

आम्ही काय करतो?

कला आणि साहित्य: समाजाला प्रेरणा देणारे कार्यक्रम, कार्यशाळा, आणि सांस्कृतिक उपक्रम.

बुद्धिविकास: विचारांना चालना देणाऱ्या चर्चा, परिसंवाद, आणि शैक्षणिक उपक्रम.

सामुदायिक बांधिलकी: गावापासून राज्यापर्यंत, प्रत्येक स्तरावर माणसांना एकत्र आणणारे उपक्रम.

मदतीचा हात: एकमेकांना साथ देण्यासाठी, कर्तृत्वाला वाव देण्यासाठी, आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी.

तुम्ही का सामील व्हावं?

सामाजिक बदलाचे वाहक व्हा: तुमच्या कल्पना, कौशल्य, आणि उत्साहाने समाजाला नवं दिशादर्शन करा.

व्यासपीठ मिळवा: तुमच्या कर्तृत्वाला आणि विचारांना एक मोठं मंच मिळेल.

नव्या ओळखी: गाव, तालुका, जिल्हा, आणि राज्यपातळीवर नवे मित्र, सहकारी, आणि समविचारी लोकांशी जोडले जा.

सार्थकी जीवन: माणुसकीसाठी काहीतरी करत असल्याचा आनंद आणि समाधान अनुभवा.

सामील होण्यासाठी काय कराल? आजीव सभासद व्हा: फक्त ५०० रु देऊन अक्षर मानवचा कायमचा हिस्सा व्हा.

जबाबदारी घ्या: गावात शाखा उभारण्यापासून ते कार्यक्रमांचं आयोजन करण्यापर्यंत – तुम्ही बदलाचे नेतृत्व करू शकता.

अधिक माहितीसाठी आणि सभासद होण्यासाठी आजच संपर्क करा. 8888022099

तुमचं योगदान कशासाठी?

मनुष्यबळ आणि संसाधनं: संघटनेला बळकटी देण्यासाठी तुमच्या वेळेचं, कौशल्याचं, आणि उत्साहाचं योगदान हवं.

जागरुक समाज: तुमच्या सहभागाने आम्ही एक भेदरहित, आनंदी, आणि बुद्धिमान समाज उभा करू.

वैश्विक स्वप्न: गावापासून जगापर्यंत, शांतता आणि समृद्धीचा संदेश पोहोचवण्यासाठी.


आजच पाऊल उचला! माणुसकीचा हा प्रवास तुमच्याशिवाय अपूर्ण आहे. अक्षर मानवच्या या संकल्पात सामील होऊन तुमच्या विचारांना, स्वप्नांना, आणि कृतीला एक नवी दिशा द्या. आजच सभासद व्हा, जबाबदारी घ्या, आणि समाजात बदल घडवा!

## पुस्तक परीक्षण

### धर्म, राजकारण आणि जगण्याचा जांगडगुत्ता: सिध्द

मकरंद जोशी

मराठीत आगा पिछा नसलेले म्हणजे ज्यांच्या लेखनाची मुळं पूर्वीच्या किंवा नंतरच्या लेखकांमध्ये, लेखनामध्ये जराही दिसत नाहीत असे फार मोजके लेखक आहेत. अगदी नावंच घ्यायची तर अनिल बर्वे, अनंत सामंत यांच्या जोडीला राजन खान ही सांगता येतील. यातल्या राजन खान यांच लेखन हे अशा प्रकारचं आहे की तुम्हाला आवडलं तर जाम आवडतं पण नाही तर अजिबात नाही. ते तुम्हाला निवडक- वेचक ( खरतर सोयिस्कर) आवडण्याचा पर्याय देतच नाही. राजन खान यांच्या लेखनात म्हटलं तर विविधता आहे आणि नाही ही. 'चिमुटभर रुढीबाज आभाळ', 'वळुबनातील कामधेनू' 'सत ना गत' 'रजे हो' 'हिलाल आणि मजार' या सगळ्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी वेगवेगळी आहे. एखाद्या माणसाच्या आयुष्यात नशिबाने घातलेल्या तिढ्या पासून ते सामाजिक-राजकिय वर्तुळातील नमुनेदार माणसांच्या तितक्याच नमुनेदार जगण्या पर्यंतचा पट लेखक राजन खान मांडतात. त्यांची शैली काहीशी अनौपचारिक आहे, कधी कधी एखादा माणूस पाल्हाळ लावून जरा लांबलचक बोलत राहातो तशी ही म्हणता येईल. पण राजन खान यांना आखिव रेखीव, गोळीबंद, सुशोभित आणि हिशोबीपणे मापलेल्या शैलीशी काही घेणं देणच नाही . त्यांचं सगळं लक्ष एकवटलेलं असतं ते माणसांच्या जगण्याकडे, जगताना पडणारे नैतिक-अनैतिक पेच, राजकारणाने गढूळलेलं वागणं, माणसांच्या मूलभूत वृत्ती- प्रवृत्ती, नैसर्गिक उर्मींवर लादलेल्या कृत्रिम बंधनांचे होणारे परिणाम आणि कधी व्यक्ती म्हणून कधी समूह म्हणून जगताना,वागताना घडणारं माणसातल्या माणूसकीचं आणि अमानुषतेचं ही दर्शन. हा सगळा कोलाहल राजन खान यांच्या लेखनातून इतक्या सौम्यपणे समोर येतो की त्या सौम्यपणाचीच भिती वाटू लागते.




राजन खान यांच्या या सगळ्या लेखन वैशिष्ट्यांनी ठासून भरलेली कादंबरी म्हणजे 'सिध्द'. संधिकाल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या ५९८ पानांच्या कादंबरीत लेखकाने वर्तमान वास्तवाचं अत्यंत तंतोतंत (आणि म्हणूनच भेसूर !) चित्र रेखाटलं आहे. एका कुठल्यातरी गावात - गावाचं वर्णन विशेषतः त्यातील सामाजिक-राजकीय- धार्मिक उतरंडी वरून हे गाव पश्चिम किंवा उत्तर महाराष्ट्रातलं वाटतं... पण ते महत्वाचं नाही, जर कोकणात किंवा विदर्भात हे कथानक घडलं असतं तर थोडे प्रादेशिक तपशील बदलले असते, बाकी सब घोडे बारा टक्केच! तर कुठल्याशा एका लहान गावात अचानक एक बाबा/महाराज/बुवा प्रकटतो.म्हणजे एकाएकी गावातल्या देवळाच्या पारावर बसून येणाऱ्या जाणाऱ्यांना लोकांना पाहून 'हिंदू होयंगा तो सलाम, आन मुसलमान आसचील तर रामराम' म्हणणाऱ्या एका भणंग, भटक्या माणसाला गावातली लोकं महाराज/बाबा समजतात. त्यात या बाबाला चहा आणून देणाऱ्या पोराचं नंतर नशीब फळफळतं आणि त्या माणसाच्या बुवापणावर शिक्कामोर्तबच होतं. पण दुसऱ्याच दिवशी हा बाबा गायब होतो. लोकं त्याला विसरू लागतात तर तो अचानक गावातल्या मशिदीच्या ओट्यावर बसलेला दिसतो. आधी

मंदिराच्या पारावर बसून संस्कृत स्तोत्र अस्खलितपणे म्हणणारा हा बाबा मशिदीच्या ओट्यावर बसून तितक्याच अस्खलितपणे नमाजीची बांग ही देतो. गावातले सगळ्या जाती धर्माचे, वेगवेगळ्या स्तरातले लोक तर या 'चमत्कारिक' बाबाच्या जणू भजनीच लागतात. आता भजन-पूजन करायला हा बाबा एकाच ठिकाणी दम धरत नसतो ही गोष्ट वेगळी. या तथाकथित बाबा मधील ' पोटेन्शियल' हेरून हिंदू- मुस्लिम धर्मातील पंडित आणि मौलवी, गावाच्या सरपंचापासून ते आमदारापर्यंत राजकीय झेंडा, त्यांचे समर्थक आणि विरोधक, कोणत्याही गोष्टीचा धंदा करण्यात वाकबगार असलेले दुकानदार असे सगळेच आपापल्या फायद्यासाठी या बाबाला लक्ष्य करू लागतात. आणि मग जे घडत जातं ती एक प्रचंड वेगाने, बेफामपणे, नियंत्रणाशिवाय सुसाट सुटलेली रोलर कोस्टल ठरते.




राजन खान यांनी लहानमोठ्या डझनभर व्यक्तिरेखांमधून 'सिध्द' ही कादंबरी अक्षरशः जिवंत केली आहे. किर्तन करणाऱ्या आणि वारकरी पंथाचा जहांगीर महाराज,स्वतः एका देवळाचा पुजारी असूनही गावातील इतर ब्राह्मणांच्या ढोंगी- धंदेवाईक वागणुकीवर सतत कोरडे ओढणारा रामकाका, कुराण आणि हादिस मध्ये अडकलेला वाहिद मौलाना, सगळ्या बाबतीत राजकीय हिशोबीपणा करणारा सरपंच चंबा बिरादर, चंबाला विरोध करून स्वत:चं राजकीय अस्तित्व निर्माण करू पाहणारा गेनुबुवाचा मनोहर... कादंबरीतल्या पात्रांची यादी मोठी आहे. लेखकाने चितारलेली ही सगळी माणसं अस्सल आहेत. त्यांचे गुणदोष, वृत्ती - प्रवृत्ती, त्यांच्यात होणारं परिवर्तन आणि त्यांचा जगाकडे बघण्याचा नजरिया यामुळे कादंबरी अतिशय वेधक झाली आहे.

धर्म, धर्माचा बाजार, धर्माचं राजकारण, धर्माची दहशत आणि धर्माचं खरं स्वरूप या सगळ्याचा उहापोह या कादंबरीत आहे. एकाच गावात वर्षानुवर्षे राहणाऱ्या वेगवेगळ्या धर्माच्या लोकांना एकमेकांच्या धर्माबद्दल तर जराही माहिती नसतेच पण स्वत:च्या धर्माबद्दल ही ते कसे आंधळे असतात ते या कादंबरीत सहजपणे आलं आहे. मुसलमान असून वारकरी परंपरेचं पालन करणारा जहांगीर महाराज किंवा स्वतः ब्राह्मण असून ब्राह्मणत्वाचं अवडंबर माजवणाऱ्या आपल्याच जातभाईंना परखडपणे झाडणारा रामकाका हे अपवाद आहेत. नारायण आप्पा, चित्राव शास्त्री, गेनुजीबुवा, सुरेश बारनावे,कासिम मुजावर हे सगळे गावागावातल्या नमुन्यांचे ढळढळीत प्रतिनिधी आहेत.

धर्म ही गोष्ट कशामुळे निर्माण झाली, माणसाने तिचा वापर कसा केला, त्यातून काय कमावलं- गमावलं, सुखासमाधानाने जगण्यासाठी खरोखरच धर्माची आवश्यकता आहे का? अशा मूलभूत मुद्यांवर कादंबरीतली पात्रे चर्चा करतात, वाद घालतात आणि संघर्ष ही करतात. लेखक एखाद्या तटस्थ कॅमेऱ्याप्रमाणे हे सगळ दाखवत जातो. महाराष्ट्राच्या- भारताच्या कुठल्याही खेडेगावात घडू शकणारी, कदाचित घडून गेलेली एक गोष्ट लेखक आपल्याला सांगतो. या गोष्टीला आरंभ नाही आणि अंतही नाही. कादंबरी वाचून संपल्यानंतरही संपत नाही.

तुम्ही धर्माबद्दल हळवे असा किंवा उदासीन, तुम्हाला जर भोवतालची सामाजिक-राजकीय-धार्मिक परिस्थिती अस्वस्थ करत असेल तर संधिकाल प्रकाशनाने प्रकाशित केलेली राजन खान यांची 'सिध्द' ही कादंबरी अवश्य वाचा. काही वेदनांवर उपाय ती वेदना तीव्र करणं हाच असतो.

## अक्षर मानव माणूस संमेलनाचे स्थळ : सीताखांडी, ता. भोकर, जि. नांदेड
















**अस्वीकरण / धोरण (Disclaimer)** लेखांमधील मते: या मासिकात प्रसिद्ध झालेली मते ही सर्वस्वी संबंधित लेखकांची किंवा व्यक्तींची असतात. प्रकाशक, संपादक किंवा मुद्रक यांच्याशी ती सहमत असतीलच असे नाही.